नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## १२ दिवसांत कोरोना रुग्णांमध्ये ३ हजाराने घट

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
गेल्या २ आठवड्यांपासून देशभरात कोरोना व्हायरसचे रुग्ण कमी होत आहेत. १२ दिवसांत ३००० हून अधिक सक्रिय रुग्ण कमी झाले आहेत. १२ जून रोजी देशभरात ७१३१ सक्रिय रुग्ण होते, ज्यांची संख्या ४०८९ वर आली आहे. गेल्या २४ तासांत फक्त ७ नवीन रुग्ण आढळले आहेत. ३३६ रुग्ण बरे झाले आहेत.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ पासून कोरोनाच्या नवीन प्रकारामुळे १२७ जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या २४ तासांत ३ रुग्णांनी आपला जीव गमावला आहे. सर्वाधिक ४० जणांचा मृत्यू केरळमध्ये झाला आहे. तर महाराष्ट्रात ३३ जणांचा मृत्यू झाला आहे.

* वर्ष ३६ * अंक ३६० * * खामगांव (बुलडाणा) * बुधवार, दिनांक २५ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रलेख

## खरीखरी...

# नकट्यांचा सीझफायर

जगातील सर्वाधिक मानलेला नेत्यान्याहू नावाचा नरपुंगव आणि नोबेलसाठी आसुसलेले भारतद्रोही ट्रम्प या दोघांचेही नाक इराणने छाटून टाकले आहे. इराणने कालपर्यंत जे जे पराक्रम केले, त्याची नक्कीच इतिहासात नोंद होईल. नेत्यान्याहू नावाचा एक हृदयविहीन इसम जो इज्रायलचा प्रधानमंत्री आहे. तो इराणला दूषणे देत होता. मानवतेची आठवण करून देत होता. पण जेव्हा गाझावर याच नेत्यान्याहुने अनेक अमानुष अत्याचार केले. लहान बालकांवरही अनन्वित छळाचार केले. हजारोंना ठार मारले. 'असूनी खास मालक घराचा' असा असणारा गाझा गरज नसताना रक्तबंबाळ झाला. तोपर्यंत सदासर्वदा विजय मिळवणा?या इज्रायलला कुणीही महागुरू मिळाला नव्हता. जो हमासने हल्ला केला तो हमासचा घोर अपराध होता. हे मान्यच करावे लागेल. त्यानंतर इज्रायलने निरपराधांचा जो जीवघेणा संहार केला. त्याला काय म्हणायचे. त्याचाच बदला इराणने घेऊन टाकलेला आहे. अमेरिकेच्या भिकेवर इज्रायल सारख्या कुत्र्याला बैल झाल्याचा भास झाला होता. पण इराणने इज्रायलचा घास आपल्या घशात घालून त्याची अशी काही भंबेरी उडवली आहे की, आता यापुढे दहा हजार वर्षे इज्रायल इराणचा ई सुद्धा तोंडाने उच्चारणार नाही. इज्रायल जवळ बारा दिवस लढण्याची ताकद होती. त्यात इज्रायलला असे वाटले की, दोन ते चार दिवसात इराणला नामोहरम करून आपण विजेता होऊ. त्यांना इराणवर आक्रमणाचे निमित्त हवे होते. म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने इराणकडे अणू युद्धाची शक्ती नाही. हे स्पष्ट केल्यावरही इज्रायलने पहिला हल्ला केला. त्यानंतर इराणने केलेले पलटवार इज्रायलने स्वप्नातही कल्पना सारखे नव्हते. असे हल्ले इज्रायलने कधीच पाहिले नव्हते. कोणे एकेकाळी मध्यपूर्वेतील पाच-सहा राष्ट्रांना एकाच वेळी इज्रायलने धूळ चारली होती. त्यावेळी त्यांना चढलेली नशाही इराणने काही झापडीमध्येच खटाखट उतरवून टाकली. दोन-तीन दिवसांपूर्वी इज्रायल नेस्तनाबूत होण्याच्या काठावर आला होता. नंतर त्याने चक्क एका दुसऱ्या नकट्याला म्हणजेच अमेरिकेच्या ट्रम्पला आपल्या नकट्या नाकाने इराणचे नाक कापण्याची विनंती केली. हपापलेल्या ट्रम्पने झपाटलेल्या नेत्यान्याहुचे ऐकून इराणवर हल्ला करण्याची चूक केली. हल्ला करायचा म्हणून, जे नाही ते आहे. अशी हाकाटी पेटवून अणू-अणू करत जणू काय अमेरिकेवरच अणू हल्ला होणार आहे. अशा अविभार्वात तथाकथित शांतिदूत ट्रम्पने आपली अस्त्रे डागली. लगेच त्यानंतर इराण आता शरणागती पत्करणार असे घोषितही करून टाकले. परंतु, इराणला ना याने ओळखले. ना त्याने ओळखले. इराणने त्यांच्या हल्ल्याला जराही धूप न घालता प्रतिहल्ला करण्याची केवळ धमकीच दिली नाही. तर इमानदारीने अमेरिकेला इशारा देऊन कतारच्या अमेरिकी सैनिक तळावर हल्ला केला. इराणला जर मानव संहार करायचा असता. तर त्याने पूर्वसूचना न देताही हल्ला केला असता. पण माणुसकी शाबूत असल्यामुळे अमेरिकेच्या एकाही सैनिकाला ठार केले नाही. तरीही त्या सैनिकी तळाला मारमार मारून अमेरिकेला आपला हिसका दाखवूनच दिला. इराण प्रेमाने ऐकत नाही. धमकीला तो मानत नाही. शरण येण्याचे नाव काढत नाही आणि आपल्या राक्षसपुत्र म्हणजे नेत्यान्याहू व त्याच्या राष्ट्राला आपल्या संहार करण्याच्या अस्त्राने संपवू शकतो. हे ट्रम्पच्या डोक्यात फिट बसल्यामुळे इकडून तिकडून मस्का मारून, आगाऊ पणासाठी प्रसिद्ध असलेल्या ट्रम्पने आपल्या कापलेल्या नाकाला साक्षी ठेवून सीझफायर म्हणजे शस्त्रसंधीची घोषणा करून टाकली. त्याने सीझफायर साठी तीन तासांचा अवधी दिला. तो अगदी संपण्याच्या पाच मिनिटे अगोदर इराणने इज्रायलच्या शहरांवर जबरदस्त मारा करून त्यांचे प्रचंड मोठे नुकसान केले. त्यानंतर नकट्या इज्रायलला आपल्या आकाच्या म्हणजेच ट्रम्पच्या आदेशाचे उल्लंघन करणे शक्य नव्हते. म्हणजे इराणने सीझफायर पूर्वीच्या वेळेचा सदुपयोग करून धूम धडाक्याने केलेला घणाघाती हल्ला मुजोर इज्रायलला मूग गिळून पचवावा लागला.? त्यानंतर इराणने स्पष्टच म्हटले की, सीझफायर नंतर आम्ही हल्ला केलेला नाही. पण इज्रायलने जराही हूं किंवा चूं केले, तर त्याची खैर आम्ही अजिबात करणार नाही. आता ट्रम्पला नोबेलसाठी आपले नामांकन दाखल करायला हरकत नाही. आपण एक नव्हे तर दोन युद्धांमध्ये आगाऊगिरी करून नकट्या नाकाने का होईना, सीझफायर करून टाकले. म्हणूनच आपण नोबेल साठी नोबल मॅन आहोत असे समजून उद्या ट्रम्पने स्वतःलाच नोबेल पुरस्काराची घोषणा केल्यास आम्हाला नवल वाटणार नाही. कसेही असो, या दोन नकट्यांच्या सीझफायरमुळे जगाला दिलासा मिळाला आहे. तिसरे विश्व युद्ध टळले आहे, असे सध्या तरी वाटते. हाच काय तो दिलासा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## ५ महिन्यांत वाढले ८% मतदार : काही बूथवर २० ते ५०% वाढ

# फडणवीस यांचा विजय संशयास्पद



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभा मतदारसंघात अवघ्या 5 महिन्यांत तब्बल 8 टक्के मतदारांची वाढ झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मंगळवारी केला.

बीएलओंनी आपल्या रिपोर्टमध्ये या मतदारसंघात अज्ञात व्यक्तींनी मतदान केल्याची नोंद केली. यामुळे हे दुसरे-तिसरे काही नसून, मतांची चोरी आहे, असे ते म्हणालेत.

राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतांची मोठे हेराफेरी करण्यात आल्याचा आरोप केला होता. या निवडणुकीत भाजपचा विजय निश्चित करण्यासाठी मॅच फिक्सिंग करण्यात आले होते, असे ते म्हणाले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा त्यांनी एका पोस्टद्वारे महाराष्ट्रातील भाजपच्या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातील आकडेवारी दिली आहे.

राहुल गांधी म्हणाले की, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात अवघ्या 5 महिन्यांत 8 टक्के मतदारांची वाढ झाली. काही बूथवर तर 20 ते 50 टक्क्यांची वाढ झाली. बीएलओ अर्थात बूथ लेव्हल अधिकाऱ्यांनी या प्रकरणी काही अज्ञात व्यक्तींनी मतदान केल्याची नोंद केली. माध्यमांनीही विना सत्यापित पत्ते असणाऱ्या हजारो मतदारांचा शोध घेतला आणि निवडणूक आयोग? गप्प - की यात सहभागी? ही वेगवेगळी हेराफारी नाही. ही स्पष्ट मतांची चोरी आहे. या प्रकरणी कव्हरअप करणे हाच कबुलीनामा आहे.

त्यामुळेच आम्ही मशीन मशीन-रीडेबल डिजिटल मतदार यादी व सीसीटीव्ही फुटेज त्वरित प्रसिद्ध करण्याची मागणी करत आहोत, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या मतदार यादी घोटाळ्याप्रकरणी निवडणूक आयोगावर निशाणा साधला असून, या प्रकरणी कसून चौकशी करण्याची मागणीही हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

### किती काळ हवेत बाण सोडणार?

राहुल गांधी यांच्या या आरोपाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आकडेवारीसह प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधी यांच्या अपमानास्पद पराभवाचे दुःख वाढले असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. ते अजून किती काळ हवेत बाण सोडत राहणार? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला आहे.

यासंदर्भात फडणवीस यांनी एक पोस्ट केली आहे. त्यात
झूठ बोले कौवा काटे
काले कौवे से डरियो..
महाराष्ट्रातील अपमानास्पद पराभवाचे तुमचे दुःख दिवसेंदिवस वाढत आहे हे मी मान्य करतो.
पण तुम्ही किती काळ हवेत बाण सोडत राहणार आहात?

महाराष्ट्रात 25 पेक्षा जास्त मतदारसंघ आहेत जिथे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीदरम्यान 8% पेक्षा जास्त मतदार वाढले आहेत आणि अनेक ठिकाणी काँग्रेसने विजय मिळवला आहे.

माझ्या दक्षिण-पश्चिम मतदारसंघाला लागून असलेल्या पश्चिम नागपूर मतदारसंघात 7% मतदार (27,065) वाढले आणि काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी तेथे निवडणूक जिंकली. उत्तर नागपूरमध्ये 7% (29,348) मतदार वाढले आणि काँग्रेसचे उमेदवार नितीन राऊत यांनी विजय मिळवला. अशी आकडेवारी देत फडणवीसांनी राहुल गांधी यांना प्रत्युत्तर दिले आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या भत्त्यांत मोठी वाढ



शक्तिपीठ महामार्गासाठी २० हजार ७८७ कोटी
वस्तू, सेवा कर अधिनियमनात सुधारणा
मंत्रिमंडळ बैठकीमध्ये महत्त्वाचे निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
आदिवासी शासकीय वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता व आहार भत्त्यांमध्ये वाढ करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

या बरोबरच महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत हडको संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या २ हजार कोटींच्या कर्जास शासन हमी देण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. यात संभाजीनगर महानगर पालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी 822 कोटींचा देखील समावेश आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी 20 हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे आता या कामाला देखील गती मिळणार आहे.

महाराष्ट्र वस्तू, सेवा कर अधिनियमन 2017 च्या बिलात सुधारणा करण्यात येणार आहे. नवीन वस्तू व कर विधेयक आणणार असल्याचा निर्णय आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत या बाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांसाठी सुधारणा विधेयक आणणार असून शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि. सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गास मान्यता देण्यात आली. राज्यातील साडेतीन शक्तिपीठ , दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर अंबेजोगाई सहित १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग. प्रकल्प महामंडळामार्फत राबवणार, प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यासह अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आलेत.

## शक्तिपीठ महार्गावरून

# मंत्रिमंडळ बैठकीत नाराजीनाट्य

दोन मंत्र्यांनी केला कडाडून विरोध

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' असणाऱ्या शक्तीपीठ महामागार्साठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत भूसंपादनासाठी 20 हजार कोटी रुपयांची मोठी तरतूद मंजूर करण्यात आली. मात्र, या निर्णयावर मंत्रिमंडळातच मतभेद झाल्याचे उघड झाले आहे. कोल्हापूरचे मंत्री प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांनी या प्रकल्पासंदर्भात सरकारने पुनर्विचार करून निर्णय घेण्याची विनंती केली आहे.

शक्तिपीठ महामार्ग हा राज्यातील 12 जिल्ह्यांमधून जाणार असून यासाठी 86 हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. मात्र या महामागार्ला कोल्हापूर, धाराशिव, सोलापूर येथील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला आहे. शक्तिपीठ महामागार्ला शेतकऱ्यांचा होणारा विरोध लक्षात घेता कोल्हापूर जिल्ह्यातील मंत्री प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांनी कॅबिनेटमध्ये नाराजी व्यक्त केली.

लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर-सांगली भागात महायुतीला बसलेला फटका लक्षात घेता, पुन्हा त्याच भागात शेतकऱ्यांचा रोष ओढवून घेणे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सरकारला धोकादायक ठरू शकते, असे मत दोन्ही मंत्र्यांनी व्यक्त केल्याची माहिती मिळत आहे.

शक्तिपीठ महामार्ग हा 12 जिल्हे आणि 39 तालुक्यातून जाणारा महामार्ग असून तो राज्यासाठी फायदेशीर असला, तरी शेतकऱ्यांचे नुकसान करणारा आहे, अशी भूमिका मंत्री प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांनी बैठकीत मांडली. विधानसभा निवडणुकीत शक्तिपीठ महामागार्मुळे मोठा फटका बसल्याने स्थानिक शेतक?यांना विश्वासात घेऊन आणि पुनर्विचार करून निर्णय होणे अपेक्षित आहे, असे मत मंत्र्यांनी बैठकीत मांडल्याची माहिती आहे.

## रेल्वे भाडेवाढ : १ जुलैपासून अंमलबजावणी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
१ जुलैपासून रेल्वे प्रवास महाग होऊ शकतो. नॉन-एसी मेल/एक्सप्रेस गाड्यांचे भाडे प्रति किलोमीटर १ पैशाने आणि एसी क्लासचे भाडे प्रति किलोमीटर २ पैशांनी वाढू शकते.

इकॉनॉमिक टाईम्सने सूत्रांच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे. १ जुलैपासून नवीन दरांनुसार भाडे द्यावे लागेल.

## देशभरातील अनेक उड्डाणे रद्द

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
इराण-इस्त्रायल युद्धाचा परिणाम भारत आणि मध्य पूर्वेकडील देशांना जाणाऱ्या विमानांवर होत आहे. वाढत्या तणावामुळे आणि हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे आतापर्यंत ६० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. दिल्ली विमानतळावरून ४८ उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. त्यापैकी २८ उड्डाणे दिल्लीत येणार होती आणि २० उड्डाणे दिल्लीहून निघणार होती.

जयपूर विमानतळावरून ६ उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. यामध्ये मध्य पूर्वेला जाणारे आणि येणारे प्रत्येकी ३ उड्डाणे समाविष्ट आहेत. युएई-कतार हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे लखनौ विमानतळावरून अबू धाबी आणि शारजाहला जाणारे २ उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. अमृतसर विमानतळावरून दुबईला जाणारे विमानही रद्द करण्यात आले आहे.

सोमवारी रात्री इराणने त्यांच्या अणु तळांवरील हल्ल्यांचा बदला घेण्यासाठी कतारमधील अमेरिकेच्या अल-उदेद हवाई सैन्य तळावर 6 क्षेपणास्त्रे डागली. यानंतर कतार, बहरीन, युएई, इराक आणि कुवेतने त्यांचे हवाई क्षेत्र तात्पुरते बंद केले.

मध्य पूर्वतील विमानतळ पुन्हा सुरू होत असताना, आम्ही त्या मार्गांवर काळजीपूर्वक आणि हळूहळू आमच्या सेवा पुन्हा सुरू करत आहोत. आम्ही संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आम्ही सुरक्षित मार्ग निवडत आहोत, असे इंडिगोकडून सांगण्यात आले. मध्य पूर्व हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे काही उड्डाणांवर परिणाम होऊ शकतो, असे स्पाइसजेटने म्हटले आहे. अकासा एअरची अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

## अवघ्या अडीच तासांत मोडली

# इराण-इस्त्रायल युद्धबंदी

■ वृत्तसंस्था, तेल अवीव, दि. २४ :
युद्धबंदी लागू झाल्यानंतर काही तासांतच इस्त्रायल आणि इराण दोघांनीही त्याचे उल्लंघन केले. इस्त्रायलने नुकतेच इराणची राजधानी तेहरानमधील एका रडार साइटवर हवाई हल्ला केला. इस्त्रायली आर्मी रेडिओने हल्ल्याची पुष्टी केली आहे.

तत्पूर्वी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांना फोन करून इराणवरील हल्ला थांबवण्याची विनंती केली.

वृत्तसंस्था अल जझीराच्या वृत्तानुसार, नेतन्याहू ट्रम्प यांना म्हणाले, "मी हल्ला थांबवू शकत नाही, कारण इराणने प्रथम युद्धबंदीचे उल्लंघन केले आणि त्याला प्रत्युत्तर देणे आवश्यक आहे."

दोन्ही देशांमधील युद्धाच्या १२ व्या दिवशी, आज पहाटे ३:३२ वाजता, ट्रम्प यांनी युद्धबंदीच्या कराराची घोषणा केली. सकाळी १०:३८ वाजता त्यांनी आणखी एक पोस्ट केली आणि लिहिले, आतापासून युद्धविराम लागू झाला आहे,



कृपया तो मोडू नका.

तथापि, युद्धबंदी सुरू झाल्यानंतर अवघ्या अडीच तासांतच इराणने इस्त्रायलवर सहा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. बेअरशेबा शहरातील एका इमारतीवर क्षेपणास्त्र आदळले, ज्यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आणि २० हून अधिक जण जखमी झाल्याची माहिती माध्यमांमध्ये झळकली आहे.

# बच्चू कडू यांना मोठा दिलासा

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावर कायम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :
प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाच्या अपात्रता निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे बच्चू कडू यांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच बच्चू कडू यांचे जिल्हा बँकेचे अध्यक्षपद कायम राहणार आहे. 16 जून रोजी बच्चू कडू यांना अपात्र ठरवण्यात आले होते.

उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, न्यायालयाने अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरून दिलेला निर्णय हा सत्याचा विजय आहे. भाजपच्यामदतीने त्यांनी बँकेतून आम्हाला हटविण्याचा प्रयत्न केला. परंतु न्यायदेवतेने न्याय केला आहे, असे बच्चू कडू म्हणाले.

## हिंदीला राष्ट्रभाषा घोषित करा

### अबू आझमींची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
राज्यात पहिलीपासून तीन भाषा शिकणे सक्तीचे करण्यात आले असून, तिसऱ्या भाषेच्या रूपात हिंदी लादण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.



विरोधी बाकावर असलेल्या समाजवादी पार्टीने मात्र सरकारच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे.

सपाचे आमदार अबू आझमी यांनी तिसरी भाषा म्हणून हिंदी शिकवणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे. इतकेच नव्हे तर, हिंदीला देशाची राष्ट्रभाषा म्हणून घोषित करावे, आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्वांसाठी हिंदी शिकणे बंधनकारक करावे, असेही त्यांनी ठामपणे म्हटले आहे.

अबू आझमी म्हणाले, तिसरी भाषा म्हणून आपल्याकडे हिंदीचा पर्याय आहे आणि ती देशभरात लागू करायला हवी.

## हिंदी : अंतिम निर्णय सात दिवसात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
महाराष्ट्रातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा लागू करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला असून या निर्णयाला राज्यभरातून मोठा विरोध केला जात आहे. राज्यभरातून होणारा विरोध लक्षात घेता राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.



हिंदी भाषेबाबतचा अंतिम निर्णय पुढील सात दिवसात घेतला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे हिंदी भाषेला विरोध करणाऱ्या राजकीय पक्षांशी, नेत्यांशी तसेच भाषा तज्ज्ञांसोबत बैठक घेणार आहेत.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, इतर राज्यांची भाषा व त्यांचे धोरण, तसेच हिंदीबाबतचे धोरण या मुद्द्यांवर सरकारची भूमिका समजावून सांगणार आहेत. धोरणाला विरोध करणाऱ्यांची नेमकी भूमिका काय आहे, त्यानंतर या संपूर्ण बाबींचा समावेश असलेला एक समग्र अहवाल तयार करण्यात येईल.

## वाल्मीक कराड सूत्रधार

■ वृत्तसंस्था, बीड, दि. २४ :
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुदर्शन घुले हा केवळ गँग लीडर होता. वाल्मीक कराड हाच त्यांचा पडद्यामागे असणारा खरा सूत्रधार होता, असा दावा विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी मंगळवारी कोर्टात युक्तिवाद करताना केला.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात जवळपास 3 तास सुनावणी झाली. त्यात वाल्मीक कराडच्या वकिलांनी 2 तास युक्तिवाद केला. तर उज्ज्वल निकम यानी 1 तास युक्तिवाद केला.

# स्वीय सहाय्यकांना मूळ विभागात रुजू होण्याचे आदेश

### मुख्यमंत्री फडणवीसांची कठोर भूमिका : मंत्र्यांची धाकधूक वाढली

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वीय सहाय्यकांना तातडीने मूळ विभागात रुजू होण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता महायुती सरकारमधील मंत्र्यांची धाकधूक वाढली आहे.



यापूर्वी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकारमधील सात मंत्र्यांना पीएस आणि ओएसडी नियुक्त करण्याची परवानगी नाकारली होती. हा विषय अनेक दिवसांपासून चर्चेत होता. मात्र आता पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाकडून मंत्र्यांचे पीए म्हणून कार्यरत असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या मुळ विभागात रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

इतकेच नाही तर मूळ विभागात हजर न झाल्यास संबंधित सरकारी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.


# अजित पवारांच्या खात्याकडे लक्ष ठेवा..

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
अजित पवारांच्या खात्याकडे लक्ष ठेवा. तो निधी कुठे वितरित होतो याची माहिती घ्या, असा आदेश राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना दिला असल्याची माहिती आहे.

मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांची वेगळी बैठक घेतली. यात निधी वाटपावरून शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे.

अजित पवार निधी देत नाहीत, अशी तक्रार शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी अनेकवेळा बोलून दाखवली आहे. मंत्री संजय शिरसाट यांनी देखील थेट आरोप केले होते. त्यामुळे निधी वाटपाच्या मुद्द्यावरून महायुतीमधील तिन्ही घटक पक्षांमध्ये धुसफूस असल्याचे दिसून येते. याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर त्यांच्या पक्षाच्या

### शिवसेनेच्या मंत्र्यांना शिंदेंचे आदेश



मंत्र्यांसोबत वेगळी बैठक घेतली असल्याचे समजते.

एकनाथ शिंदे निधी वाटपावरून आक्रमक झाल्याचे देखील पाहायला मिळाले. अजित पवार यांच्या खात्यावर लक्ष ठेवण्याचे आदेश शिंदेंनी आपल्या मंत्र्यांना दिले आहेत. अजित पवारांच्या खात्यात 14-14 हजार कोटींचे दोन निधी आहेत. त्यावर लक्ष ठेवले पाहिजे. हा निधी कुठे वितरीत होतो याची माहिती आपल्याला मिळाली पाहिजे असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, राज्यात निधी वाटपाच्या मुद्द्यावरून शिंदे गटाच्या मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी अजित पवारांची भेट घेतली होती. त्यापूर्वी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी देखील पवारांची भेट घेतली होती. या भेटीत निधी वाटपावर चर्चा झाल्याची माहिती आहे.

शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी अजित पवारांकडून निधी मिळत नसल्याची तक्रार करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यानंतर निधी हा काही आपल्या खिशातून देत नाही, राज्यातील तिजोरीला शिस्त आणण्यासाठी काही पावले उचलली जातात असे अजित पवारांनी स्पष्ट केले होते.

अजित पवारांच्या निधी वाटपावर केवळ शिंदे गटच नव्हे तर भाजपच्या आमदारांनी देखील नाराजी व्यक्त केली होती. तीच नाराजी आज पुन्हा एकदा उफाळून आल्याचे दिसून आले.

## तेजस्वीची नाराजी ठाकरेंकडून दूर



**मुंबई :** गेल्या काही महिन्यांपासून ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर या पक्षात नाराज असल्याच्या चर्चा होत्या. आता उद्धव ठाकरे यांनी तेजस्वी घोसाळकर यांची नाराजी दूर केली आहे. ठाकरेंनी तेजस्वी घोसाळकर त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली असून, त्यांची दहिसर विधानसभेच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.

तेजस्वी घोसाळकर यांनी काही दिवसांपूर्वी पक्षातील सर्व पदांचा राजीनामा दिला होता. त्यामुळे त्या पक्षात नाराज असल्याच्या चर्चा सुरू होत्या. त्यातच भाजप नेते आणि मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी तेजस्वी घोसाळकर यांची बँकेच्या संचालक मंडळावर नियुक्ती केली. त्यामुळे त्या भाजपात प्रवेश करू शकतात, अशी चर्चा सुरू झाली होती. पक्षाकडून त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न सुरू होता. तेजस्वी घोसाळकर यांनी थेट 'मातोश्री'वर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आणि आपण उद्धव ठाकरेंसोबतच राहणार असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर आता पुन्हा एकदा त्यांच्यावरती पक्षाने मोठी जबाबदारी दिली आहे. माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर यांची दहिसर विधानसभा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दहिसर विधानसभा हा ठाकरे गटासाठी महत्त्वाचा मतदारसंघ मानला जातो. या ठिकाणी मराठी मतदार चांगल्या संख्येने आहे. त्याशिवाय, शिवसेनेला मानणारा मोठा मतदार आहे.

## बँक मॅनेजरला आमदाराची धमकी

**जालना :** जालना जिल्ह्यातील बदनापूर विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे आमदार नारायण कुचे हे पुन्हा एकदा अडचणीत सापडले आहेत. जालन्यातील एका बँक मॅनेजरला त्यांनी फोनवर शिवीगाळ करून धमकी दिली आहे. त्यांच्यातील या संवादाची कथित ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल झाली आहे. या प्रकरणानंतर आता बँक कर्मचारी संघटना देखील आक्रमक झाली असून त्यांनी जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांच्याकडे आमदार कुचे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे.

एका शेतकऱ्याच्या थकीत कर्ज प्रकरणात त्यांनी बँक अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भातली संभाषणाची क्लिप देखील व्हायरल होत आहे. तुम्हाला समजून सांगितले तर समजत नसेल तर मला हाताने समजावून सांगावे लागेल. तुमची इच्छा असेल तर तिथे आल्यावर हाताने समजून सांगण्याची भाषा कुचे यांनी वापरली आहे. कुचे यांच्या क्लिप मुळे आता बँक कर्मचारी संघटनेने संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, बँक अधिकाऱ्यांनी कुचे यांच्याविरोधात तक्रार दाखल करीत कारवाईची मागणी केली आहे.

### पक्षात वशिल्याचा भारी वापर : निर्णय घेताना कुणीही विचारत नाही

# ठाकरे गटात भास्कर जाधव नाराज

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४:

पक्षात हल्ली काय उद्योग चालले आहे कळत नाही. एखादा निर्णय घेताना तिथल्या पदाधिकाऱ्यांना विचारले पाहिजे. तिथल्या जबाबदार नेत्याला प्रश्न विचारला पाहिजे. हा भारी वशीला हल्ली लागला आहे असे म्हणत उबाठाच्या कार्यशैलिवर उबाठाचे नेते भास्कर जाधव यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

भास्कर जाधव पुढे बोलताना म्हणाले की, वशील्याचा माझ्यावर काही परिणाम होणार नाही. पक्षामध्ये कुठला नेता मला का टार्गेट करेल? का करेल, प्रत्येकाचे कार्यक्षेत्र ठरले आहे. पक्षातील नेत्यांच्या मनात माझ्याबद्दल नितांत आदर आहे.

**राऊतांवर अप्रत्यक्ष टीका**

भास्कर जाधव म्हणाले की, तालुका प्रमुख, विभाग प्रमुख मी केलेले काम. बाळासाहेबांच्या अष्टप्रधान मंडळामध्ये जे 13 नेते कार्यरत होते त्यातील सुभाष देसाई आजही कार्यरत असून पूर्णक्षमतेने काम करत आहेत.

ते जेव्हा मला भेटतात तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला



दिसतो. दिवाकर रावते यांच्यासारखा लढवय्या माणूस जेव्हा भेटतो तेव्हा ए भास्कर इकडे या असा आवाज देतात. तू चांगला बोलतोस असे म्हणत कौतुक करतात. माझा द्वेष करणार कोण?

दुसरी गोष्ट माझा द्वेष कुणीही करत नाही, करत असेल तर त्याला मी किती किंमत देणार. किती द्यावी असे तुमचे म्हणणे आहे, मी काय आहे त्यांना माहिती आहे, ते काय मला माहिती आहे, असे म्हणत त्यांनी नाव न घेता विनायक राऊतांवर टीका केल्याचे बोलले जात आहे.

भास्कर जाधव म्हणाले की, मला पक्षातील कोणी नेता त्रास देत नाही आणि कुणी द्यायच्या भानगडीत पडू नये, हे पण सांगून टाकतो हे पूढचे बोलायला नको, असा इशाराच त्यांनी अप्रत्यक्षपणे राऊतांना दिल्याची चर्चा आहे.

मी घुसमटणारा माणूस नाही. शरद पवारांना सोडण्याची राजकीय चूक केली हे मी नाकारणार नाही. माझी कुणीही घुसमट केली नाही. माझी शिवसेनेत घुसमट होते असे काही नाही. माझ्याकडे प्रामाणिक म्हणून पहा.

मी कुठल्या पदाकरता यापूर्वीही अशी नौटंकी केली नाही, आणि करणार नाही. मी अधिवेशनावेळी सरकारला सांगितले की माझ्याऐवजी दुसऱ्या कुणाला विरोधी पक्षनेता करा. मी माझे पत्र मागे घेतो, असे भाष्कर जाधव यांनी स्पष्ट केले . दरम्यान, ठाकरे गटातून ते बाहेर पडणार असल्याची चर्चा आहे.

### निवृत्तीपेक्षा एकनाथ शिंदेंचे नेतृत्व स्वीकारा...

#### उदय सामंतांचा जाधवांना सल्ला



ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी राजकारणातून निवृत्त व्हावेसे वाटते, असे विधान केले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले असतानाच, शिंदे गटातील नेते व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी भास्कर जाधवांना निवृत्ती न घेता एकनाथ शिंदेंचे नेतृत्व स्वीकारण्याचा सल्ला दिला आहे. भास्कर जाधव माझ्याबद्दल बोलताना मातोश्रीचा राग काढला असल्याचेही सामंत म्हणाले.

भास्कर जाधव हे शिवसेनेच्या (ठाकरे गट) कोकणातील प्रमुख नेत्यांपैकी एक मानले जातात. मात्र अलीकडील काही दिवसांपासून पक्षातील अंतर्गत मतभेद, खासकरून खासदार संजय राऊत यांच्याशी त्यांचे संबंध तणावपूर्ण असल्याच्या चर्चा आहेत. जाधव यांनी काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत राजकारणातून निवृत्ती घ्यावीशी वाटते, असे विधान केल्यामुळे या चर्चांना अधिकच जोर मिळाला. दरम्यान, जाधव यांना उदय सामंत यांनी एकनाथ शिंदेंचे नेतृत्व स्वीकारण्याचा सल्ला दिला आहे.

भास्कर जाधव यांच्यासारख्या नेत्याने निवृत्तीचा विचार करणे योग्य नाही, अशी माझी भावना आहे. माझे हे वक्तव्य म्हणजे कुठल्याही प्रकारचा टोमणा नाही. ही माझी खरी भावना आहे, असे उदय सामंत म्हणाले.भास्कर जाधव हे मातोश्रीवर प्रचंड नाराज असल्याचे दिसते. मी ही त्यावर खुल्या मनाने सांगतो की, भास्कर जाधव यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारले तर आम्हाला आनंद होईल, असा सल्लाही त्यांनी भास्कर जाधवांना दिला.

# सीएम हे लूट करणारे ठग आणि पेंढारी...

### फडणवीसांवर राजू शेट्टींची विखारी टीका

■ वृत्तसंस्था
कोल्हापूर, दि. २४:



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणजे लूट करणारे आणि पेंढारी असल्याची टीका शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी केली आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या कामांत मोजणी करताना बळाचा वापर होत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे. यासंदर्भात सोशल मीडियावरील पोस्ट माध्यमातून त्यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे.

फडणवीस यांचा दुसरा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून शक्तिपीठ महामार्गाकडे पाहिले जाते. याआधी समृद्धी महामागार्ला देखील मोठ्या प्रमाणात राज्यातून विरोध झाला होता. मात्र तरी देखील समृद्धी महामार्ग आता पूर्ण झाला आहे. त्याचप्रमाणे आता शक्तिपीठ महामागार्ला देखील विरोध होत आहे. शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी या महा-मार्गासाठी जमीन मोजणी करताना बळाचा वापर होत असल्याचा आरोप केला आहे.

सरकार शक्तीपीठ महामार्ग करण्याचा अट्टाहास का व कशासाठी करत आहे. कारण या शक्तिपीठ महामागार्तून जवळपास 50 हजार कोटीचा ढपला पाडला जाणार असल्यानेच हा प्रकल्प जनतेच्या माथी लादला जात असल्याचा आरोप शेट्टी यांनी केला आहे.

फडणवीस सरकार म्हणजे शक्तिपीठ महामागार्तून राज्यातील शेतकरी व जनतेचे लूट करणारे सध्याच्या युगातील ठग आणि पेंढारी झाले आहेत. धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील वानेवाडी येथे शक्तिपीठ महामार्ग मोजणीसाठी आले असता शेतकऱ्यांनी या मोजणीस कडाडून विरोध केला.

राज्य सरकार पोलिसांना हाताशी धरून बळाचा वापर करून जबरदस्तीने मोजणी करत आहेत. देवेंद्र फडणवीस म्हणजे शेतकरी व जनतेचे लूट करणारे सध्याच्या युगातील ठग आणि पेंढारी झाले आहेत. सध्या रत्नागिरी -नागपूर हा रस्ता अस्तित्वात असून या मार्गावर तुरळक वाहतूक आहे.

सध्या रोज या मार्गावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास किमान ४० लाख टोल संकलित होण्याची आवश्यकता असताना सध्या दररोज ११ ते १२ लाख इतकाच टोल गोळा होत आहे. गेल्या दिड वर्षापासून हा महामार्ग तोट्यात जात असून याचा भुर्दंड सामान्य जनतेवर बसणार असल्याचे शेट्टी म्हणाले.

## विठ्ठल दर्शनाचे बनावट पास विक्रीचा प्रकार उघड

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४:

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरच्या दिशेने जाणाऱ्या पायी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या भक्तिभावाला काळिमा फासवणारी घटना उघडकीस आली आहे.

काही फसवणूक करणाऱ्या टोळ्यांनी विठ्ठल दर्शनासाठी मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी बनावट 'टोकन दर्शन' पास तयार करून विक्री केल्याचा प्रकार समोर आला. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी सात भाविकांची फसवणूक करण्यात आली.

हे भाविक विठ्ठल मंदिरात प्रवेशासाठी दाखल झाल्यानंतर त्यांच्या टोकन पासचे स्कॅनिंग करण्यात आले. स्कॅनिंग दरम्यान हे पास बनावट असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर मंदिर प्रशासनाने तातडीने कारवाई करत या सात भाविकांना बाजूला घेत चौकशी सुरू केली.

चौकशीत या भाविकांनी सांगितले की, सासवडच्या परिसरात काही अज्ञात व्यक्तींनी त्यांना 100 रुपयांच्या मोबदल्यात 'दर्शन टोकन' देऊ केले. जुने अधिकृत पास स्कॅन करून त्यांच्या आधारे बनावट टोकन तयार करून ते भाविकांना देण्यात आले होते. मात्र या भाविकांना पास कोणी दिले, कुठे दिले, आणि नेमके कसे मिळाले याची ठोस माहिती देता आलेली नाही. मंदिर प्रशासनाने त्यांना



पोलिसांच्या ताब्यात दिले असून पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

आषाढी वारीच्या काळात लाखो भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी गर्दी करतात. यामध्ये प्रत्यक्ष रांगेत उभे राहून दर्शन घेण्यासाठी 10 ते 12 तासांचा वेळ लागतो, तर अधिकृत टोकन प्रणालीमुळे अर्ध्या तासात दर्शन मिळू शकते. याचाच गैरफायदा घेत काही फसवणूक करणाऱ्या व्यक्तींनी बनावट पास तयार करून भाविकांची दिशाभूल केली. अधिकृत संकेतस्थळावरूनच मोफत टोकन बुक करावे असे मंदिर समितीने म्हटले आहे.

## भुसे घेणार राज ठाकरेंची भेट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४:



राज्यातील शाळांमध्ये प्राथमिक स्तरावर हिंदी शिकवण्याच्या निर्णयावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह साहित्यिक, भाषा तज्ज्ञ व अन्य संबंधितांशी प्रत्यक्ष चर्चा करण्याची तयारी दर्शवली आहे.

मंत्री दादा भुसे म्हणाले की, हिंदीच्या निर्णयामागे कोणताही राजकीय हेतू नसून, विद्यार्थ्यांचे भविष्यातील शैक्षणिक हित लक्षात घेऊनच अभ्यासपूर्ण निर्णय घेतला गेला आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांचे हित कसे जपले जाईल, याचे सविस्तर सादरीकरण विरोधकांना, साहित्यिकांना आणि नागरिकांना करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दादा भुसे म्हणाले म्हणाले की, कोणाचीही गैरसमज होऊ नये म्हणून आम्ही थेट संवाद साधणार आहोत. ज्यांना काही शंका किंवा तक्रारी आहेत, त्यांच्याशी वैयक्तिक भेट घेऊन सर्व माहिती समोर मांडली जाईल. यामुळे सकारात्मक आणि सर्वसमावेशक निर्णय होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## १२०० फूट खोल दरीत आढळले तलाठी आणि तरुणीचे मृतदेह

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४:

जुन्नरनजिक 1200 फूट खोल दरीमध्ये 2 मृतदेह आढळून आले आहेत. यामध्ये श्रीगोंद्याचे तलाठी आणि एका महाविद्यालयीन तरुणीचा मृतदेह समावेश आहे. जुन्नरच्या कोकणकडा परिसरातून दोघांनी आत्महत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

श्रीगोंद्याचे तलाठी रामचंद्र साहेबराव पारधी, असे मृत व्यक्तीचे नाव आहे. रुपाली खुटाण आंबोली असे मृत महाविद्यालयीन तरूणीचे नाव आहे.

जुन्नरच्या रिव्हर्स वॉटर फॉलजवळ एक पांढऱ्या रंगाची कार गेली काही दिवस उभी होती. ही गोष्ट स्थानिकांना निदर्शनास आली तेव्हा त्यांनी शोधाशोध सुरू केली. यावेळी दरीच्या कड्यावर पुरुष आणि स्त्रीच्या चपला आढळून आल्या. यानंतर रेस्कू टीमने दरीत उतरुन शोध घेतला असता रुपाली आणि रामचंद्र यांचे मृतदेह आढळून आले.

त्यानंतर जुन्नर पोलिस आणि रेस्क्यू टीमने कठिण परिस्थितीत मृतदेह दरीतून बाहेर काढले आहेत. रमेश आणि प्रियंका यांनी आत्महत्या केली, की त्यांचा खून करण्यात आला. याबाबतचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. पोस्टमार्टम रिपोर्टनंतर मृत्यूचे कारण समजणार आहे. पोलिसांकडून आजूबाजूला चौकशी केली जात आहे. मृत्यूचे कारण आणि दोघांमधील संबंध याबाबत सखोल चौकशी सुरू आहे.

**तरुण ट्रकचालकाचा कॅबिनमध्ये खून**

दुसरीकडे नाशिकमध्ये चामारलेणी रोडवर नग्नावस्थेत मिळालेल्या मृतदेहाची ओळख पटवण्यात पोलिसांना यश?? आले. कर्नाटकमधील तरुण मरकुंडा उमेश अंबिकार (34) असे या तरुणाचे नाव आहे.

हा ट्रकचालक असून डिझेल संपल्याने ट्रक दिंडोरी रोडवर आरोग्य विज्ञान विद्यापीठाजवळ उभा केलेला मिळाला. या ट्रकच्या कॅबिनमध्ये रक्ताचे डाग मिळून आले असून या कॅबिनमध्येच त्याचा खून करून मृतदेह चामार लेणी रोडवर फेकून दिल्याचे तपासात निष्पन्न झाले.

## सामाजिक कार्यकर्ता खंडणी घेताना जाळ्यात

■ वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. २४:

कोल्हापुरातील एका स्वयंघोषित सामाजिक कार्यकत्यार्ला तब्बल 15 लाख रुपयांची खंडणी घेताना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे.

हा कार्यकर्ता पूर्वी बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेचा पदाधिकारी म्हणून राजकारणात सक्रिय होता. पण त्याच्या काळ्या कारनाम्यांची माहिती मिळताच त्याची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती. पोलिसांनी या प्रकरणी दोघांना बेड्या ठोकल्या आहेत.

जयराज कोळी असे अटक करण्यात आलेल्या स्वयंघोषित सामाजिक कार्यकत्यार्चे नाव आहे. त्याच्यावर एका औषधी उपकरकणांच्या पुरवठादाराकडून 15 लाखांची खंडणी उकळण्याचा आरोप आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व कागल पोलिसांनी मंगळवारी सकाळी एक संयुक्त कारवाई करत जयराज गोळी व त्याचा सहकारी युवराज खराडे यांना अटक केली. कोळीने फियार्दीला खंडणी द्या, अन्यथा तुमच्या पत्नीच्या नावाने खोटे चौकशीचे अर्ज टाकून त्रास देण्याची धमकी दिली होती.

पोलिसांच्या माहितीनुसार, जयराज कोळी एका औषधी उपकरणे पुरवठा करणाऱ्या व्यक्तीला चौकशीचे खोटे अर्ज दाखल करून वारंवार त्रास देत होता. 20 लाख रुपये दे त्यानंतर मी सर्व अर्ज मागे घेतो अशी मागणी त्याने केली होती. फिर्यादी व आरोपी यांच्यात अखेर 15 लाखांवर तडजोड झाली होती. कागलच्या लक्ष्मी टेकडी लगत हे पैसे देण्याचे ठरले होते.

पण तत्पूर्वीच फिर्यादीने या प्रकाराची माहिती पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी व्यवस्थित सापळा रचून जयराज कोळी व युवराज खराडे या दोघांच्या मुसक्या आवळल्या. या दोघांवरही कागल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बहुतेक साहित्यिक लाचार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४:

महाराष्ट्रामध्ये तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करण्यात येत आहे. यावरुन उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला आहे. महाराष्ट्रातील 90% साहित्यिक हे लाचार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रात मराठी भाषेवर अन्याय होत असताना, अभिनेते नाना पाटेकर, प्रशांत दामले आणि माधुरी दीक्षित हे गप्प का? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला.

महाराष्ट्रामध्ये हिंदीची सक्ती करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांचा आटापिटा सुरू आहे. तर दुसरीकडे हिंदी भाषिक उत्तर प्रदेश मध्ये 5000 हिंदी भाषिक शाळा बंद पडल्या असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. मुंबई महानगरपालिकेसाठी हे सर्व सुरु आहे. या विषयी महाराष्ट्रातील साहित्यिकांशी चर्चा करण्याची गरज नाही, अभिनेते नाना पाटेकर, प्रशांत दामले, माधुरी दीक्षित कुठे आहेत? राज्यातील लाभार्थी आणि पुरस्कार प्राप्त 90% साहित्यिक हे लाचार असल्याचे राऊत म्हणाले.

# महादेव बाबर राष्ट्रवादीत

### उद्धव ठाकरेंना दादांचा झटका

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :

शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे माजी आमदार महादेव बाबर यांनी सोमवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची घोषणा केली.

ते दस्तुरखुद्द अजित पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर बाबर यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिल्यामुळे उद्धव ठाकरे यांना पुण्यात जोरदार झटका बसला आहे.

महादेव बाबर हे ठाकरे गटाकडून हडपसर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज होते. या नाराजीतूनच त्यांनी ठाकरे गटाला जय महाराष्ट्र केला. सुरूवातीला बाबर कोणत्या पक्षात जाणार? याविषयी अनेक अटकळी व्यक्त केल्या जात होत्या. पण अखेर त्यांनी स्वतःच आपण सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाणार असल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे राष्ट्रवादीतील पुण्यातील ताकद वाढणार आहे.

मी पूर्वीपासूनच अजित पवार यांच्या काम करण्याच्या पद्धतीचा चाहता आहे. त्यातच सध्या त्यांची सत्ताही आहे. त्यामुळे विकासाचे मार्ग मोकळे आहेत. त्यामुळे मी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत अजित पवारांच्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्या परिसराचा विकास हाच माझा अजेंडा आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मी चांगले काम करून दाखवेल, असे महादेव बाबर बोलताना म्हणाले.

# महाराष्ट्रात दोन दिवस मुसळधार

### मराठवाडा व विदर्भात मध्यम ते जोरदार : समुद्रकिनाऱ्यावर जाणे टाळण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४:

भारतीय हवामान विभागाने पुढील दोन दिवस महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच पुणे, घाटमाथा, सातारा, कोल्हापूर आणि मराठवाडा व विदर्भात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

विदर्भ विभागात नागपूर, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांत मंगळवारी आणि बुधवारी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात ढगाळ वातावरण राहील. सकाळी काही ठिकाणी विजांसह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे.

मुंबईमध्ये पुढील सलग पाच दिवस समुद्राच्या लाटा मोठ्या प्रमाणात वाढणार आहेत. त्यामुळे किनारी भागांतील रहिवासी व पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यावर जाणे टाळावे. प्रशासन व बचाव दल सजग आहेत, पण प्रत्येकाची स्वतःची सुद्धा जबाबदारी आहे, सुरक्षित राहणे आणि सागरापासून लांब राहण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

अलिबाग तालुक्यात काल रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार वादळी



पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नाशिकमध्ये गोदावरी नदीची पूरस्थिती सलग सहाव्या दिवशीही कायम आहे. दुतोंड्या मारुतीच्या कमरेपर्यंत पुराचे पाणी पोहोचले असून, रामकुंड आणि गोदा घाटाचा परिसर पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे.

सिंधूदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यात माणगांव खोऱ्यातील वसोली गावातील कर्ली नदीवरील कुत्रेकोंड पुलावरून दुचाकीस्वार वाहुन गेला तर त्यांच्यासोबत असलेला सहकारी बचावला आहे.

**मराठवाड्यात प्रशासन सतर्क**

पुढील 3-4 दिवसांत गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्रात अति जोरदार पावसाची शक्यता आहे. अशा हवामानामुळे आगामी काळात नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

विदर्भात म्हणजे नागपूर, अमरावती, वर्धा, यवतमाळ इत्यादी भागात तसेच मराठवाड्यात हलका ते मध्यम पाऊस होणार असून, अतिरिक्त सावधगिरी आवश्यक आहे. काही भागांत विजा व वाऱ्याची शक्यता असल्याने स्थानिक प्रशासन सतर्क आहे.

कोकणातील घाटमाथ्यावर ढगांचा गडगडाट सुरू आहे. महाड, पोलादपूर, चिपळूण इ. ठिकाणी दरड कोसळण्याचा धोका कायम आहे. या भागातील लोकांनी हवामानानुसार सावधगिरी बाळगावी अशी सूचना जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे. तर मुंबईत ढगाळ वातावरणामुळे दुपारी हलका ते मध्यम पाऊस झाला. परंतु, रात्री वाऱ्याबरोबर मुसळधार सरींचा इशारा देण्यात आला आहे. बीएमसीने नदी-नाल्यांच्या पाणी पातळीवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी विशेष टीम तैनात केली आहे.

**हवामान विभागाच्या इशारा**

मुंबईसाठी यलो अलर्ट : आगामी 26 जून पर्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे; समुद्रकिनारी लाटांपासून सावध राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.

विदर्भात अतिजोरदार पावसाचा अंदाज असून, यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाडा भागात काही ठिकाणी अचानक जास्त पावसाची शक्यता असल्याने प्रशासनाला दक्ष राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### त्रिभाषा सूत्रावर अंतिम निर्णयाआधी

# राज्यव्यापी सल्लामसलत!

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा मोठा निर्णय

■ दीपक कैतके
मुंबई, दि. २४:



त्रिभाषा सूत्राच्या अंमलबजावणीबाबत राज्य शासन आता कोणताही एकतर्फी निर्णय घेणार नसून, साहित्यिक, भाषा तज्ज्ञ, राजकीय नेते आणि संबंधित सर्व घटकांशी सल्लामसलत करूनच अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी स्पष्ट भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. वर्षा निवासस्थानी रात्री उशिरा झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर तसेच शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत त्रिभाषा सूत्राचा सखोल आढावा घेण्यात आला.

यावेळी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत मराठी विद्यार्थ्यांचे ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट प्रणालीतील संभाव्य नुकसान टाळण्याबाबतही चर्चा झाली. सर्व राज्यांतील धोरणात्मक स्थिती, त्यांचा अनुभव आणि अभ्यास लक्षात घेऊन महाराष्ट्रासाठी समग्र सादरीकरण तयार करण्यात येईल, असा निर्णयही यावेळी झाला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हा विषय केवळ भाषेचा नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्यातील संधींचा आहे. त्यामुळे कोणताही निर्णय सर्व संबंधितांची मते ऐकून, सखोल अभ्यास केल्यानंतरच घेतला जाईल.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे आता सल्लामसलतीची प्रक्रिया राबविणार असून, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि राजकीय नेतृत्वाशी थेट संवाद साधण्यात येणार आहे. या बैठकीला मुख्यमंत्री सचिवालयाचे डॉ. श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, राहुल रेखावार हे उपस्थित होते.

बुधवार दि. २५ जून २०२५ ✽ पान ३ ✽ खामगाव

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

# आणिबाणित लढा देणाऱ्या व्यक्तींचा आज होणार सन्मान

## जिल्हाधिकारी कार्यालयात गौरवमुर्तींचा सन्मान सोहळा व चित्रप्रदर्शनाचे आयोजन

**बुलढाणा (महासागर प्रतिनिधी) :** देशातील १९७५ साली झालेल्या आणीबाणीला ५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणीच्या कालावधीत बुलढाणा जिल्ह्यातील बंदिवास सोसलेल्या व्यक्तींचा बुधवार, दि. २५ जून रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे दुपारी १२ वाजता सन्मान सोहळा व प्रशासकीय इमारतीत चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जिल्हावासियांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

देशात २५ जून १९७५ ते ३१ मार्च १९७७ या कालावधीत घोषित करण्यात आलेल्या आणीबाणीच्या कालावधीत ज्या व्यक्तींना बंदिवास सोसावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान व यथोचित गौरव करण्याच्या व आणीबाणी संदर्भात प्रदर्शन आयोजित करण्याच्या सूचना केंद्र व राज्य शासनाने जिल्हा प्रशासनाला दिल्या आहे.

त्यानुषंगाने आणीबाणी काळात बुलढाणा जिल्ह्यातील व्यक्तींनी सामाजिक व राजकीय कारणासाठी बंदिवास भोगला. त्या व्यक्तींना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र देवून यथोचित गौरव करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात जिल्ह्यातील आणीबाणी लढ्यातील व्यक्तींचा बुधवार, २५ जून, रोजी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. तसेच यानिमित्त आयोजित चित्रप्रदर्शनाचे देखील उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. हे प्रदर्शन जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी २५ जूनपासून पासून एक महिना राहणार आहे. या सन्मान सोहळयास व चित्रप्रदर्शनास बुलढाणा जिल्हावासियांनी आणि आणीबाणी लढ्यातील व्यक्तींनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## उमरा- एकलारा शिवदांड रस्ता मोकळा करून अडवणूक केलेल्यांवर कारवाईसाठी

# तहसील कार्यालयात शेतकऱ्यांचा बैठा सत्याग्रह आंदोलन

**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी):-** तालुक्यातील उमरा- एकलारा रस्ता मोकळा करून देण्यासाठी शेतकऱ्यांनी तीन वेळा निवेदन देऊन तीन महिने उलटूनही रस्ता मोकळा करून दिला नाही. महसूल विभागाला पुन्हा निवेदन देवून व अधिकाऱ्यांशी चर्चा करुन रस्ता मोकळा करून द्यावा. संबंधित शेतकऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करावी.अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करू असा इशारा शेतकऱ्यांनी दिला होता. परंतु न्याय न मिळाल्याने त्यानुसार आज २४ जून रोजी काँग्रेस सेवा दलाचे पदाधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते शिवकुमार गिरी (एकलारा) यांच्या नेतृत्वाखाली संग्रामपूर तहसील कार्यालयात बैठा सत्याग्रह आंदोलन केले. परंतु तहसीलदाराने सदर रस्त्याची मोजणी करून तीन आठवड्यात रस्ता मोकळा करून देण्याचे लेखी आश्वासन दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले.



तालुक्यातील दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी १७ मार्च २०२५ , ६ जून आणि २३ जून रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले होते की उमरा शिवारातील शिवदांड रस्ता हा नदीपात्रातून जाणे -येणे करणे शक्य नसल्याने गट क्रमांक ७१ पासून ते गट नंबर ९२ पर्यंत शिवदांड रस्ता मोकळा करून द्यावा. तसेच उमरा शिवारातील गट नंबर ४८ जवळ चालू असलेला उमरा -एकलारा दोन्ही गावांना जोडणारा रस्ता शेतकऱ्याने नांगरणी केली.

त्यामुळे अडथळा निर्माण केला आहे .पेरणीचे दिवस असल्याने शेतीचे कामे करण्यास रस्ता कायम बंद होतो.त्याचप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देवूनही न्याय न मिळाल्याने तसेच छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान शिबिरामध्ये सुद्धा सहभाग नोंदवून उपविभागीय अधिकारी जळगाव (जामोद) व तहसीलदार संग्रामपूर यांच्यासोबत चर्चा करून तीन महिने उलटून गेले तरी न्याय मिळाला नसल्याने आम्ही दोन्ही गावचे अन्यायग्रस्त शेतकरी लोकशाही मार्गाने २४ जून २०२५ रोजी संग्रामपूर तहसील कार्यालयात न्याय मिळेपर्यंत बैठा सत्याग्रह आंदोलन करणार आहोत. त्यामध्ये शेतकऱ्यांचे काही बरे वाईट झाल्यास याला जबाबदार तहसील कार्यालय राहील असा निवेदनाद्वारे इशारा देवूनही न्याय मिळाला नाही. त्यामुळे अखेर आज २४ जून रोजी उमरा- एकलारा गावात दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते शिवकुमार गिरी (एकलारा)यांच्या नेतृत्वाखाली संग्रामपूर तहसील कार्यालयात बैठा सत्याग्रह आंदोलन सुरू केले.

अखेर तहसीलदार प्रशांत पाटील यांनी लेखी आश्वासन दिले की भूमापक भूमी अभिलेख नझुल कार्यालयाकडून सदर रस्त्याची मोजणी करून २० ते २५ दिवसांनी शिवदांड रस्ता मोकळा करून दिल्या जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी आंदोलन स्थगित केले आहे.

> महसूल कायदा आणि गाव नकाशानुसार शिव रस्ते गावासाठी राखीव असतात. कोणताही व्यक्ती, संस्था शिव रस्त्यात मालकी हक्क सांगू शकत नाही. नियम असा सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण केल्यास त्या व्यक्तीविरुद्ध कारवाई केली जावू शकते. असा कायदा सांगतो. त्यानुसार संबंधितावर कारवाई करावी.
>
> **– शिवकुमार गिरी**
> काँग्रेस सेवादल जि.पदाधिकारी
> एकलारा(बानोदा) ता. संग्रामपूर

# उपविभागीय अधिकारी कार्यालयात आढावा बैठक

**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)-** उपविभागीय अधिकारी कार्यालय जळगाव जामोद येथे जळगाव जामोद मतदारसंघाचे आ.डॉ. संजय कुटे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये २४ जून रोजी विविध लोकोपयोगी योजनांच्या अनुषंगाने आढावा बैठक पार पडले. यामध्ये राज्य शासनाने घरकुल लाभार्थ्यांना मोठा दिलासा दिला असून त्यामध्ये घरकुल लाभार्थ्याला ५ ब्रास रेती मोफत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून यामध्ये जळगाव जामोद तालुक्यातील घरकुल पात्र लाभार्थ्यांना घर बांधकामा करिता प्रति लाभार्थी यांना ५



ब्रास मोफत रेती देण्याच्या रॉयल्टी पासेस वाटप करण्यात आल्या असून तालुक्यातील मंजूर घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास मोफत रेतीचे वाटप यापुढेही करण्यात येणार आहे.

तसेच या आढावा बैठकीत जळगाव जामोद उपविभागातील सहाय्यक निबंधक व सर्व बँक व्यवस्थापकांच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात खरीप हंगाम, पिक कर्ज वाटपा बाबत देण्यात आलेले लक्षांक झालेले कर्ज वाटप, प्रलंबीत कर्ज वाटप याबाबत आढावा घेवुन प्राप्त लक्षांकाची १०० टक्के पुर्तता करण्याबाबत व शेतकऱ्यांना तात्काळ पिक कर्ज वाटप करण्या संबंधीचा सहाय्यक निबंधक व बँक व्यवस्थापकांच्या कार्याचा आढावा घेवुन सर्वांना सुचनाही यावेळी देण्यात आल्या.या आढावा बैठकीला उपविभागीय अधिकारी जळगाव जा,जळगांव जामोद तहसिलदार पवन पाटील, संग्रामपुर तहसिलदार प्रशांत पाटील , शेगाव तहसिलदार,गट विकास अधिकारी जळगाव जा. संदीपकुमार मोरे, यांचेसह संग्रामपुर व शेगाव गटविकास अधिकारी तसेच लिड बँकेचे व्यवस्थापक, सर्व सहाय्यक निबंधक तसेच सर्व बँकेचे व्यवस्थापक यावेळी उपस्थित होते.

## अतिक्रमण धारकांना नोटीस

**खामगाव (का.प्र.) :** खामगाव नगर परिषदे मार्फत शहरातील सर्व अतिक्रमण धारकांना नोटीस बजाविण्यात आली आहे. सदर नोटीस मध्ये नमूद आहे की, २७ व २८ जून २५ रोजी शहरातील अतिक्रमणधारकांनी त्यांचे अतिक्रमण केलेले आहे त्यांनी सदर अतिक्रमण तात्काळ काढून घ्यावे. सदर अतिक्रमण स्वतःहून न काढल्यास नगर परिषदेकडून पोलिस बंदोबस्त व संरक्षणात काढून जप्त करण्यात येईल. राहिले, असेही या नोटीसमध्ये नमूद आहे.

# खाद्य तेल अभियान योजनेंतर्गत गोदाम बांधकाम व तेल काढणी युनिटसाठी अनुदान मिळणार

**बुलढाणा (महासागर प्रतिनिधी) :** राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (गळीतधान्य) २०२५-२६ अंतर्गत शेतकरी उत्पादक संघ किंवा कंपनी, सहकारी संस्था व खाजगी उद्योगांना गोदाम बांधकाम व तेल काढणी युनिटसाठी प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी जुलै २०२५ अखेरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज कुमार ढगे यांनी केले आहे.

उत्पादित अन्नधान्याची साठवणूक सुधारण्यासाठी व अधिक भाव मिळवण्यासाठी गोदामाची आवश्यकता लक्षात घेऊन, योजनेत २५० मेट्रिक टन क्षमतेचे गोदाम बांधण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा ₹१२.५० लाख (जे कमी असेल) इतके अनुदान मंजूर करण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी स्मार्ट, वखार महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा नाबार्डच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बँकेकडे प्रकल्प सादर करावा लागेल, कर्ज मंजूरीनंतरच अनुदान पात्रता निश्चित होईल, अर्ज अधिक प्रमाणात प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या मान्यतेनुसार सोडत पद्धतीने निवड केली जाईल.

तेलबिया संकलन, प्रक्रिया व उत्पादन कार्यक्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने तेल काढणी युनिट (१० टन क्षमता) उभारणीसाठी देखील प्रोत्साहनपर अनुदान उपलब्ध आहे. शासकीय व खाजगी उद्योग, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक संघ किंवा कंपनी यांना प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा ₹९.९० लाख (जे कमी असेल) इतके अनुदान मिळणार आहे.

तेलबियांवर प्रक्रिया करणारी यंत्रसामग्री, उपकरणे आणि प्रक्रिया युनिटसाठी हे अनुदान दिले जाईल.

संबंधित संस्थांनी बँकेकडे प्रकल्प सादर करून कर्ज मंजुरी घेणे आवश्यक आहे.

यासाठीचा अंतिम अर्ज सादरीकरण कालावधी जुलै २०२५ अखेरपर्यंत ठेवण्यात आलेला आहे. तालुका कृषी अधिकारी कार्यालयात संबंधित शेतकरी उत्पादक संघ किंवा संस्था यांनी अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा. अधिकाधिक शेतकऱ्यांनी व शेतकरी उत्पादक संघांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# सिंदखेडराजा तहसील कार्यालयात ७ हजाराची लाच घेताना दोन महसूल कर्मचाऱ्यांना एसीबीने रंगेहात पकडले

**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी) :** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा यांनी सिंदखेडराजा येथील तहसील कार्यालयात लाचखोरी प्रकरणात मोठी कारवाई केली आहे. दोन महसूल कर्मचाऱ्यांना तब्बल ७,००० रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यात आरोपीं रावसाहेब बाबुराव काकडे तलाठी, वय ५० वर्षे, ता. सिंदखेडराजा, व मनोज काशीराम झीणे महसूल सहायक, वय ४५ वर्षे, कार्यरत: तहसील कार्यालय सिंदखेडराजा , तक्रारदार व्यक्तीस शिवारातील शासकीय शेतजमिनीचा नामांतरी व्यवहार लवकर करण्यासाठी आरोपी तलाठ्याने ७,००० रुपये लाचेची मागणी २० जून २०२५ रोजी केली होती. त्या बाबत तक्रारदाराने ही माहिती एसीबीकडे दिल्यानंतर २४ जून रोजी पोलिस निरीक्षक भागोजी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली सापळा रचण्यात आला. आरोपींना रु. ७,००० लाच स्वीकारताना तहसील कार्यालयात रंगेहात पकडण्यात आले. सदरकार्यवाही मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती, सचिंद्र शिंदे, अप्पर पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक, पोलीसं निरीक्षक, रमेश पवार, अँन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा, व सोबत सापळा पथक एएसआय, शाम भांगे, पोहेकॉ. प्रविण बैरागी, राजेंद्र क्षिरसागर, पोना / जगदिश पवार, विनोद लोखंडे, पोकॉ. शैलेश सोनवणे, रंजीत व्यवहारे, चापोना नितीन शेटे, चापोकों/शेख अरशद, अँन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पार पाडली.एसीबी व इतर सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या तत्परतेने ही कारवाई यशस्वी ठरली या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एसीबीकडून सुरू आहे. लाचखोरीला चाप बसावा आणि शासकीय व्यवहार पारदर्शक व्हावेत, यासाठी ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

# भर पावसात केली प्रकल्प संचालकांनी घरकुलाची पाहणी



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी) -** सर्वांसाठी घरे हे केंद्र शासन व महाराष्ट शासनाचे धोरण असून राज्यात ३० लाख घरे मंजूर करण्यात आली आहेत तर यामध्ये बुलढाणा जिल्ह्यात ११८००० घरे मंजूर झाली असून बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकरी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील घरकुल मंजुरी काम प्रगती पथावर असून घराचे बांधकाम सुरू करणे व घर बांधकाम करून पूर्ण करणे यासाठी जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांच्या भेटी जळगाव जामोद तालुक्यातील ग्रामपंचायतींना सुरू असून २४ जून रोजी बुलढाणा जिल्हा प्रकल्प संचालक राजेश इंगळे यांनी पंचायत समिती जळगाव जामोद ला अचानक भेट देऊन घरकुल आवास योजनेचा आढावा घेऊन मंजुरी बाबत समाधान व्यक्त केले यावेळी त्यांनी तालुक्यात सतत पाऊस सुरू असताना सुद्धा सातपुडा पर्वतामधील भिंगारा या गावाला गटविकास अधिकारी संदीप मोरे यांना सोबत घेऊन भेटी दिल्या, या भेटीदरम्यान भिंगारा गावात सुद्धा पाऊस सुरू असताना भर पावसात प्रत्येक घरकुल व लाभार्थींना प्रकल्प संचालक राजेश इंगळे व गटविकास अधिकारी संदीप कुमार मोरे यांनी भेट दिली तसेच गावातील लाभार्थींना मार्गदर्शन करून घरे पूर्ण करण्याचे निर्देशित केले, यावेळी सम्पूर्ण गावाची पाहणी प्रकल्प संचालक राजेश इंगळे यांनी केली, सोबतच निवासी वसतिगृह व शाळा पाहणी सुद्धा यावेळी करण्यात आली, यावेळी सहाय्यक प्रशासन अधिकारी रवी इंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी श्रीकांत जोशी, जामोद केंद्राचे केंद्रप्रमख नितीन सातव, केशरसिंग राऊत, ग्रुह अभियंता करांगळे, ज्ञानेश्वर ठाकरे हे उपस्थित होते, तर सातपुडा पर्वत रांगेत अडचणी असताना सुद्धा लाभार्थी घरे पूर्ण करीत असल्याचे समाधान प्रकल्प संचालक राजेश इंगळे यांनी व्यक्त केले.

# क्षय आरोग्य धाम येथे योगासन व ध्यान योग कार्यक्रम

**बुलढाणा (महासागर प्रतिनिधी) :** आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने क्षय आरोग्य धाम, बुलडाणा येथे रुग्णालय परिसरात योगासन व ध्यान योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुशील चव्हाण होते. कार्यक्रमाला डॉ. कोठारी सर, डॉ. हेलगे मॅडम, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून नॅचरोपॅथीतज्ञ डॉ. मंजू जाधव यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात परिसरातील अधिकारी, परिसेविका, कार्यालयीन लिपिक वर्ग, पॅरामेडिकल स्टाफ, औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.डॉ. मंजू जाधव मॅडम यांनी योग म्हणजे काय, अष्टांग योग, यम-नियम, आहार-विहार आदी बाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले. योगशिक्षिका कु. कालींदा जायभाये यांनी ''कर्मयोगी व्हा आणि कामासोबत योगाची सांगड घाला'' या उक्तीला अनुसरून सूक्ष्म हालचालींचे महत्त्व, त्याचे फायदे, काळजी व लाभ याविषयी सखोल माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात विश्वप्रार्थनेने झाली. यानंतर शरीराच्या सूक्ष्म हालचाली, विपरीत स्थिती, दंड स्थिती, बैठक स्थिती व शयन स्थितीत विविध योगासने करण्यात आली. प्राणायाम, कपालभाती, त्राटक, शोधन मुद्रासहित भ्रामरी, ध्यान, धारणा व संकल्प घेण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप शांतीपाठ व सामूहिक जेवणाने करण्यात आला.

सदर कार्यक्रम योग दिनाच्या निमित्ताने योगाचा प्रचार व प्रसार करण्याच्या हेतूने यशस्वीरीत्या संपन्न झाला असून, यामध्ये सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाने सक्रिय सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# पावसाच्या दडीने शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट

**मेहकर (महासागर प्रतिनिधी)-** तालुक्यामध्ये वरुण राजाने विश्रांती घेताच पाण्याअभावी शेतामधील पेरलेल बी अपेक्षेप्रमाणे उगवले नसल्याने दुबार बी व खत घेण्यासाठी पैसे नसल्याने व शेतावर कर्जाचा बोजा असताना कर्जमाफी न झाल्याने दुपार कर्ज न मिळाल्याने कुटुंबाच्या भविष्याच्या स्वप्नासाठी नैराश्य अंतकरणाने बळीराजा फिरतोय सावकाराच्या दारोदारी या नैसर्गिक संकटातून सावरण्यासाठी दुबार पेरणी धारकांचे शेतातील पंचनामे करून त्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी बळीराजा करत आहे.



एका दाण्याचे हजार दाणे करून जगामधील जनतेला व प्राणीमात्राला जगविणारा देशाचा पोशिंदा बळीराजा असताना शेतातील मालाचा भाव ठरवण्याचा अधिकार बळीराजाला नाही. नात्याला कोणती पेन्शन नात्याला कोणती सरकारी सुट्टी, समाजसेवेच्या नावाखाली राजकीय नेते पुढारी सत्तेवर येण्यासाठी शेतकऱ्यांना हमीभाव कर्जमाफी पारदर्शक खरेदी-विक्री याचे गाजर दाखवून सत्तेवर बसते सत्तेवर बसल्यानंतर बघू पाहू ठरवू चौकशी करू समितीने मग नंतर ठरू असे निरर्थक अर्थपूर्ण वाक्य वापरून शेतकऱ्यांच्या पाठीवर डोक्यावर व मानेवर आसूड ओढल्या जात असल्याने शेतकरी व बळीराजा दिशाहीन झालेला असताना खरीप पिक मृग नक्षत्राच्या बारा जून रोजीच्या पहिल्या पाण्याने शेतामधील पेरणी उसनवारी करून पेरली असताना पावसाने दांडी मारल्याने शेतामधील पेरलेलं बी सोयाबीन अपेक्षेप्रमाणे उगवले नसल्याने शेतकरी दुबार पेरणीसाठी आर्थिक संकटात सापडला असून वन सावकार व इतर व्यापाराच्या दारी फिरून उसनवारी करून आवश्यकतेपेक्षा जास्त दराने पैसे घेऊन शेतीची दुबार पेरणी करत आहे. यामध्ये मोळा येथील भगवान उत्तमराव धोटे यांचे दोन एकर , भुजंग गणपतराव काकडे तीन एकर , रमेश दिगंबर काकडे ४ एकर , गजानन फाटे ६ एकर तर रायपूर येथील विष्णू रामराव काळे यांचे ८ एकर रामराव काळे यांचे दोन एकर वैभव विष्णू काळे यांचे १ एकर ची बैल जोडी व ट्रॅक्टरने दुबार पेरणी केली परंतु यांच्या व्यतिरिक्त ही मेहकर तालुक्यातील अनेक गावांमधील व मोळा रायपूर गावातील अनेक लोकांचे सुद्धा दुबार पेरणी झाल्याने या सर्व मेहकर तालुक्यामधील दुबार पेरणी धारक शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत द्यावी अशी जनता अथवा बळीराजा मागणी करत आहे अन्यथा येऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती विधानसभा लोकसभा व अन्य निवडणुकांमध्ये सुद्धा बळीराजा बघू बहुउ देऊन घेऊ समिती नेमू आणि नंतर कोणाला मतदान करायचे ते करू!

# शाळेची पटसंख्या वाढविणे फक्त शिक्षकांची जबाबदारी?

**महाराष्ट्रात सध्या जिल्हा परिषद शाळांमध्ये पटसंख्या कमी असलेल्या शाळेतील अनेक शिक्षकांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली. या कार्यवाही विषयी एक नागरिक म्हणून खुप प्रश्न निर्माण डोक्यात येतात.**

---------



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव, ता. मेहकर.**
**जि. बुलढाणा.**
**9130979300**

येथे मी शिक्षकांची बाजू अजिबात मांडत नाही फक्त न्यायीक पद्धतीने व्यवस्थेचा विचार करतो. अपवादात्मक शिक्षक वगळता अनेक शिक्षक सामाजिक व शैक्षणिक कायार्पासून खुप दुर आहेत.

पगार, पत्नी आणि परिवारात ते मग्न आहेत. शिक्षणाची गुणवत्ता व शिक्षणातील तर्कवाद कमी व्हायला शिक्षक जबाबदार आहेत हे कोणीही नाकारू शकत नाही. गुलामीच्या बेड्या तोडून मानवी स्वातंत्र्य व विज्ञानवादातुन मानसाची प्रगती हे ध्येय घेऊन महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांनी शिक्षण सुरू करून समाजात क्रांती करून जागृती केली, शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे असताना किती शिक्षकांची विद्यार्थी विज्ञाननिष्ठ, तर्कवादी, जागृत व अन्याया विरूद्ध आवाज उठवणारे आहेत? याची समिक्षा शिक्षक करतील का?

शिक्षकांविषयी अनेक प्रश्न व शंका डोक्यात आहेतच तरीही पटसंख्या कमी झाली म्हणून शिक्षकांवर निलंबणाची कार्यवाही केली हा शिक्षकांवर झालेला अन्याय आहे. अन्याया विरोधी जो बोलतो तोच खरा सुशिक्षित आहे.

जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कमी का झाली? याला कारणीभूत फक्त शिक्षकच आहेत का? यावर विचार विनीमय होणे आवश्यक आहे. जेही लोक कारणीभूत आहेत त्या सर्वांवर कारवाई होणे गरजेचे आहे. चला आपण विचार करू या.

जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थी संख्या कमी का झाली याचे एकमेव कारण म्हणजे खाजगीकरणाच्या नावाखाली खाजगी शाळांना मान्यता देऊन शिक्षणाचा व्यापर करणे. खाजगी शाळा सुरू झाल्या लाखों रुपये लोक फि भरून मुलांना शैक्षणिक कमकुवत करत आहेत ते फक्त खोटे स्टेटस टिकण्यासाठी.

श्रीमंत व नोकरदार व्यक्तींच्या लोकांनी आपली मुलं खाजगी शाळेत टाकले म्हणून सर्वसामान्य लोकांनी कर्ज काढून खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी व आपणही गरीब नाही हे दाखवण्यासाठी आपली मुलं खाजगी शाळेत टाकली. खाजगी शाळेत पैसे भरून मुलांना टाकणारे लोक सुशिक्षित आहेत का तर मुळीच नाही.

ते सुशिक्षित आणि हुशार या दोन्ही प्रवर्गात न येता ते खोटी प्रतिष्ठा जपणा?या बेगडी व मानसिक गुलाम प्रवर्गात मोडतात. याचे कारणही तसेच आहे शेतक?यांना कडून भाजीपाला घेतांना भाव करणारे, एकही रुपया गोरगरिबांना न देणारे, लोकांना व्याजाने पैसे देणारे व वरतोंड करून हक्क अधिकाराच्या बाता करणाऱ्यांना प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत आहे हे कळत नसेल आणि मोफतच्या शिक्षणासाठी वर्षाला लाखों रुपये खर्च करणाऱ्या लोकांना सुशिक्षित व हुशार कसं म्हणायचं?

खाजगी शाळांवर नियंत्रण हाच खुप मोठा उपाय आहे जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी. दुसरी गोष्ट म्हणजे एकदा निवडून आलेल्या आमदार खासदारांचे एका वर्षाच्या आत मोठ मोठे प्रशस्त बंगले, हॉटेल, बँका, कंपन्या, भुखंड आणि बरेच काही महागड्या वस्तुची कमाई होते. परंतु पंधरा विस वर्षे आमदार खासदार राहीलेला एक तरी नेता छाती ठोक पणे सांगू शकतो का? माझ्या मतदार संघातील जिल्हापरिषद शाळेची इमारत प्रशस्त, स्वच्छ व आनंददायी आहे.

जिल्हा परिषद शाळेच्या इमारती आजही बहुतांश स्वातंत्र्य पुर्व काळातील आहेत. त्याची रंगरंगोटी करण्यासाठी सरकार कडे पैसे नसावे?

राज्यात बिअर पिणाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी समिती गठीत केली जाते उत्पादन शुल्क कमी केले जाते तर शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी शासनाने समिती गठीत केल्याचे कुणाला माहिती आहे का?

जिल्हा परिषद शिक्षकांना शिकवण्याचे काम कमी आणि इतरकामे जास्त दिली जातात परंतु विद्यार्थांची संख्या वाढविण्यासाठी नियोजन करण्याचे काम दिले जात नाही. जिल्हा परिषद शाळेच्या पाच किलोमीटर पर्यंत तरी खाजगी शाळेची परवानगी नाकारली तरीही जिल्हा परिषद शाळेला सोन्याचे दिवस येतील.

शाळेतील पटसंख्या कमी होणे ही चिंतेची बाब आहेच हे कोणीही नाकारू शकत नाही पण शिक्षकांचे निलंबन हा योग्य उपाय आहे का? बरं पटसंख्ये सारख्याच अनेक गंभीर समस्या आपल्या समोर आहेत जसे अनेक ठिकाणी खड्यात रस्ते आहेत, जलजिवन मिशन योजनेचे कामही झाले नाहीत बिलही निघालेले आहेत, विमानतळ, रेल्वे, पुतळे, पुल उद्घाटन झाल्यानंतर काहीच दिवसात कोसळले, हजारो करोडो रुपयांचा चुराडा करून निकृष्ट दर्जाचे काम केले गेले. किती गंभीर आहे? मग त्या मतदारसंघातील आमदार खासदार, संबंधित इंजिनिअर, मंजूर करणारे अधिकारी यांच्यावर कारवाई कधी होणार?

ब्रिटिश कालीन पुल, रस्ते, इमारती आजही मजबूत आहेत पण आपल्या सरकारने बांधलेले रस्ते, पुल, पुतळे वाऱ्या व पावसाने पडतात तर किती जबाबदार लोकांचे निलंबन केले? मग शिक्षकांवरच कारवाई का?

खाजगी शिक्षण संस्था बहुतांश राजकीय नेते व त्यांचे नातेवाईक यांच्या च आहेत म्हणजे राजकीय लोकांच्या हितासाठी सर्व सामान्य लोकांचा घात करणे यालाच पारदर्शक व इमानदार सरकार म्हणायचे का?

फक्त शिक्षकांवर कारवाई आणि इतरांना सुट यालाच न्याय म्हणायचे का? शिक्षकांचे निलंबन झाले असताना शिक्षकांनी गप्प राहणे याला सुशिक्षित म्हणायचे का? आज काही शिक्षक निलंबित झाले उद्या कोणावरही वेळ येऊ शकते परंतु याचे गांभीर्य किती लोकांना आहे?

जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कशी वाढेल या साठी ज्या गावात पटसंख्या कमी आहे तिथे जाऊन सर्वसामान्य लोकांना जरी विचारले आणि तसे उपाय केले तर पटसंख्या वाढू शकते. मुळात वर्ग सात शिक्षक चार, वर्ग चार शिक्षक दोन असे नियोजन आणि त्यातही निलंबन असे केले तर संख्या कशी वाढेल?

पटसंख्या वाढविण्यासाठी सोपे उपाय आहेत. परंतू ते उपाय सोडून शिक्षकांचे निलंबन करणे म्हणजे जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी व पालकांचे खच्चीकरण करणे होय. शाळेची इमारत जुनी व रंगरंगोटी नाही म्हणून कोण जबाबदारी स्विकारणार? शाळेमध्ये पुरेसे शिक्षक नाही म्हणून कोण जबाबदारी स्विकारणार?

प्रत्येक ऑफिस मध्ये भ्रष्टाचार आहे कोणाला निलंबित करणार? लोकांचे काम वेळेवर होत नाहीत कोणाला निलंबित करणार? पोलीस, तलाठी, ग्रामसेवक सारखे लोक करोडो रुपयांचे गबाड गोळा करतात कोणाचे निलंबन करणार? अनेक नोकरदार लोक दिवसभर कामाच्या ठिकाणी बसतच नाहीत त्यांच्या वर काय कारवाई होणार?


गुन्हेगारी वाढली म्हणून पोलीस निलंबित होत नाहीत, सर्वसामान्य लोकांना पैसे न देता योजनेचे घरकुल मिळत नाहीत तेव्हा मात्र कोणीही निलंबित केले जात नाही. खाजगीकरण आणून सर्वात अगोदर शिक्षणावर घाव घातला गेला तेव्हा एकही शिक्षक बोलला नाही.

आता शिक्षण राहिले बाजूला शिक्षकावरच घाव घालत आहेत. तेव्हाही शिक्षक पेटून उठून स्वतःचे भविष्य वाचवू शकत नसतील तर ते शिक्षक विद्यार्थ्यांचे भविष्य काय घडवणार? पटसंख्येचे कारण दाखवून शिक्षकांना घरी बसवले जात असेल आणि शिक्षक गप्प असतील तर याचा अर्थ पटसंख्या कमी व्हायला शिक्षकच जबाबदार आहेत, हे शिक्षकांना मान्य आहे आणि निलंबनाची कारवाई योग्यच आहे हे सिद्ध होते.

शिक्षकांनी जागृत होऊन आवाज उठवणे अत्यंत आवश्यक आहे. पटसंख्या कमी आहे म्हणून शिक्षकावर ठपका ठेऊन घरी बसवणे चुकीचे आहेच. शिक्षक दर्जेदार शिक्षण देत नाहीत, शिक्षक वेळेवर शाळेत येत नाहीत, शिक्षक धर्मनिरपेक्ष राहत नाहीत, शिक्षक अंधविश्वास व पाखंडाला चालना देऊन विद्यार्थ्यांना तर्क, सत्य व विज्ञान यापासून दुर ठेवतात या कारणांमुळे कमी केले तर कोणताही प्रश्न उपस्थित होणार नाही.

पण शिक्षकांना पटसंख्येचे कारण दाखवून निलंबित केले तर हाच नियम वेगवेगळ्या विभागात लागु होऊन त्या विभागातील कामाची संख्या व वेग कमी आहे म्हणून कर्मचाऱ्यांना निलंबित केले तर ऐंशीटक्के पेक्षा जास्त शासकीय कार्यालये खाली होतील. सरकारने कोणतेही पाऊल उचलतांना न्यायीक भूमिका घ्यायला पाहिजे सुड भावना मनात ठेवून शिक्षणावर घाव घालु नये एवढीच अपेक्षा.

# कर्करोग संशोधक डॉ. सुलोचना गवांदे




**अमेरिकेत गेली ४० वर्षे कर्करोगावर संशोधन करणाऱ्या आणि विविध माध्यमांद्वारे कर्करोगाविषयी जनजागृती करीत असलेल्या डॉ सुलोचना गवांदे यांची प्रेरणादायी जीवन कहाणी...**

----------------

**देवेंद्र भुजबळ**
**_९८६९४८४८००**

----------------

कर्करोगाचे आपल्याला मागच्या दशकात प्रामुख्याने चार पाच प्रकारच माहिती होते. पण आता समजतेय की ही संख्या १०० च्या वर आहे. कर्करोग आणि इतर आजार यातील मूळ फरक म्हणजे बहुतांश इतर रोग हे आपल्या शरीराच्या बाहेरून येणा?या जीवजंतूंमुळे होतात अथवा शरीरातील इंद्रिये, स्नायू इत्यादी दुर्बळ झाल्यामुळे होतात. कर्करोग हा मात्र स्वतःच्या शरीरातील पेशीतूनच निर्माण होतो.



कर्करोग झाल्याचे निदान कळताच केवळ रुग्णच नव्हे तर त्याचे कुटुंबीयही गर्भगळीत होतात, इतकी या रोगाची धास्ती आहे. अशा या वेगळ्या आणि विलक्षण रोगावर सखोल संशोधन करणाऱ्या, तो होऊच नये म्हणून आणि झालाच तर त्याच्याशी कसा सामना करायचा यासाठी जनजागरण करणाऱ्या डॉ. सुलोचना गवांदे यांच्याशी न्यूज स्टोरी टुडे पोर्टलच्या माध्यमातून आमचा संबंध आला आणि त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन आम्ही त्यांना यथाशक्ती मदत करण्याचा प्रयत्न करू लागलो आणि करीत आहोत.

डॉ सुलोचना गवांदे या मूळ मुंबईकर आहेत ही आपल्या सर्वांसाठी मोठी अभिमानाची बाब आहे. त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईतच झाले. त्यांनी टाटा मेमोरियल सेंटरशी संलग्न कर्करोग संशोधन संस्थेतून एम एससी व पीएच डी या पदव्या प्राप्त केल्या. पुढे कर्क रोगावर प्रगत संशोधन करण्यासाठी ४० वर्षांपूर्वी अमेरिकेत जाण्याचे धाडस त्यांनी केले.

सुरुवातीला फार बिकट परिस्थितीत कर्क रोगावरचे संशोधन करीत राहिल्या आणि अजूनही करीत आहेत. पण त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केवळ संशोधन, शास्त्रीय अभ्यास आणि या विषयावर होणाऱ्या जागतिक परिषदांपुरतेच स्वतःला बंदिस्त करून ठेवले नाही तर सामान्य माणसाला कर्करोगाची, त्या विषयी सुरू असलेल्या संशोधनाची अद्ययावत माहिती मिळावी.

त्यांना धीर, दिलासा मिळावा म्हणून त्या अनेक प्रकारे प्रयत्न करीत असतात. त्यांचे दीर्घकाळ परदेशात वास्तव्य असले तरी त्यांनी त्यांची मायभूमीशी आणि माय मराठीशी असलेली नाळ तुटू दिली नाही. त्यामुळेच कर्करोगाविषयीची जाणीव, जागृती ही मराठी समाजापर्यंत पोहोचण्यासाठी त्या भरीव कामगिरी करीत असतात.

डॉ सुलोचना गवांदे यांनी २०१६ मध्ये महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रात पंधरवाड्याला एक लेख असे सदर वर्षभर लिहिले. या सदरातून त्यांनी कर्करोगाचा इतिहास, कारणे व लक्षणे, उपचार हे सर्व विषय अतिशय सोप्या भाषेत मांडले. वाचकांना ही लेखमाला अत्यंत उपयुक्त वाटली. नंतर या लेखनावर आधारित त्यांचे कर्करोगः माहिती आणि अनुभव हे पुस्तक प्रकाशित झाले.

पुढे या पुस्तकात अधिक भर घालून त्याचे इंग्रजी रूपांतर Revealing the Secrets of Cancer या नावाने २०२२ मध्ये अमेरिकेत व नंतर भारतात प्रकाशित केले गेले. गेल्या वर्षीच्या (२०२४) मराठी व इंग्रजी कालनिर्णयच्या पृष्ठभागावर कर्करोगाची कारणे आणि तो टाळण्यासाठी काय करावे याबद्दल त्यांनी लिहिलेले लेख प्रसिद्ध झाले आहेत.

कर्करोगाविषयी बोलण्यासाठी गवांदे मॅडम यांना विविध प्रसार माध्यमांद्वारे निमंत्रित करण्यात येत असते. त्या नेहमीच "योग्य" माहिती देण्याचा आग्रह धरतात. इथे योग्य शब्द जाणीवपूर्वक वापरलेला आहे, तो अशासाठी की अनेक व्यक्ती,संस्था कर्करोग बरा करण्याविषयीचे अवास्तव दावे करतात. त्यांच्या उपचारांमुळे रुग्ण बरा तर होत नाहीच उलट त्याचे शारीरिक, मानसिक, आर्थिक नुकसानच होत असते.

कर्करोगाचे अनेक प्रकार योग्य औषधोपचारांनी पूर्ण बरे होतात किंवा कित्येक वर्षे आटोक्यात राहतात. नको त्या गोष्टींच्या मागे लागण्याने हे इलाज वेळेवर होत नाहीत, परिणामी रुग्णाचा आजार अधिक गंभीर होतो आणि कित्येकदा रोग कह्यात आणणे अशक्य होते. ही अत्यंत दुर्दैवी परिस्थिती आहे आणि याबद्दल लोकांना जागरूक करणे आवश्यक आहे.

म्हणून गवांदे मॅडम मुद्रित माध्यमापुरत्याच मर्यादित राहिल्या नाहीत तर आकाशवाणी, दूरचित्रवाणी, समाज माध्यमे, प्रत्यक्ष व्याख्याने, संवाद,मुलाखती अशा विविध प्रकारच्या माध्यमांद्वारे त्या कार्यरत आहेत. अर्थात खरं म्हणजे ही काही फक्त त्यांचीच किंवा सरकार, संशोधक आणि डॉक्टरांची पण नाही तर ही जागरूकता वाढवणे हे काम तुम्हा आम्हा सर्वांचेच आहे. इतकी ही कर्करोगाची समस्या भीषण आहे. गवांदे मॅडम यांच्या कर्करोगः माहिती आणि अनुभव या पुस्तकातील सर्व लेख मुंबई आकाशवाणीच्या निवेदिकांनी वाचून महाराष्ट्रातील केंद्रांवर प्रसारित केले. अमेरिकेत येल विद्यापीठाच्या कर्करोग समितीने NPR रेडिओवर या पुस्तकावर आधारित डॉ गवांदे यांचा कार्यक्रम प्रसारित केला.

डॉ गवांदे मॅडम गेल्या वर्षी मुंबईत आलेल्या असताना, त्यांचे विचार एबीपी माझा वाहिनीवर प्रसारित होण्याचे महत्व मी ज्या वेळी या वाहिनीचे संपादक राजीव खांडेकर यांना सांगितले, त्यावेळी त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता डॉ गवांदे मॅडम यांची मुलाखत घेतली. या त्यांच्या कार्यक्रमाला खूप प्रतिसाद मिळाला. त्यांची ही मुलाखत आपण आजही यू ट्यूब वर पाहू शकता आणि आपण ती अवश्य पाहावी देखील. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत पॉडकास्ट प्रसिद्ध झाले असून ते देखील यू ट्यूब वर उपलब्ध आहेत.

कर्करोगाविषयी प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती करीत असतानाच गवांदे मॅडम लहानमोठ्या सभांतून लोकांना प्रत्यक्ष भेटून बोलत असतात. न्यूज स्टोरी टुडेच्या ठाणे येथील मेघना आणि हेमंत साने यांच्या घरी झालेल्या स्नेह मिलन कार्यक्रमात मेघना साने यांनी त्यांची घेतलेली उस्फुर्त मुलाखत आणि त्या नंतरची प्रश्नोत्तरे खूपच उद्बोधक ठरली. आकाशवाणीचे निवृत्त सहसंचालक भूपेंद्र मिस्त्री यांनी त्यांच्या कॅमेरा टीमद्वारे या मुलाखतीचे चित्रीकरण करून ती समाज माध्यमातून प्रसिद्ध केली. ही मुलाखत त्या स्नेह मिलन कार्यक्रमाचे मोठेच वैशिष्ट्य ठरले.

---------------

**(लेखाचा उर्वरीत भाग पुढील अंकी)**

# युद्धात अमेरिकेची उडी आणि संकट!

आता सिद्ध झाले आहे की अमेरिका जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे नेतांना दिसत आहे. कारण अमेरिका- इजरायल - इराण याची फक्त वर्चस्वाची लढाई आहे.परंतु यात मिडलिस्टमधील अनेक देश भरडले जात आहे.

आपण युक्रेन-रशिया, इजरायल सोबतचे हमास- हिज्बुल्ला-हुती विद्रोही -इराण यांच्या संघर्ष व युद्ध पहाले.परंतु आपण ज्याला सुपर पॉवर म्हणतो तो अमेरिका तडजोड न करता इराणवर "ऑपरेशन मिडनाईट हॅमर"च्या माध्यमातून इराणवर अचानक अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर विमानांनी इराणचे फॉर्डो उध्दवस्त करण्यासाठी बंकर बस्टर्ड बॉम्ब टाकतो आणि तेही १३६०० किलो वजनाचा एक बॉम्ब.

असे १४ बॉम्ब टाकून इराणचे फोर्डो, नातान्झ आणि इश्फाहान या ३ आण्विक केंद्रांवर हल्ले करून उध्वस्त करतो. याचाच अर्थ असा की जग विनाशाकडे जात असल्याचे दिसून येते.यामुळे आता जगातील अनेक राष्ट्र दोन गटात विभागल्या जाण्याची दाट शक्यता आहे आणि त्याची सुरुवात सुध्दा झाली आहे. अमेरिकेच्या कारवाईमुळे रशिया-चीन इराणकडून खुलेआम उतरू शकतो, यालाही नाकारता येत नाही.

अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणने इस्त्रायलवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्रे डागण्यास सुरूवात केली आहे. अमेरिकेच्या इराणच्या अणुऊर्जा प्रकल्पांवर केलेल्या हल्ल्यामुळे जगात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर हल्ल्यानंतर इराण होर्मुझचा जलमार्ग बंद करून नाकाबंदी करण्याची दाट शक्यता आहे.

होर्मूझ खाडीतून जगातील २० टक्के कच्च्या तेलाचा व्यापार होतो आणि हा मार्ग इराणने बंद केला तर याचा परिणाम भारतासह जगातील अनेक देशांवर पडु शकतो.कारण अमेरिकेने थेट अणुकेंद्रांवर हल्ला केल्याने इराणच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे. त्यामुळे इराणने अखेरचे हुकुमी अस्त्र बाहेर काढले आहे.

होर्मुझ बंद झाल्यास तेल पुरवठासाखळी विस्कळीत होईल व जागतिक बाजारपेठेत तेलाच्या किमती भडकू शकतात.अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनेई व परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेला हल्याचा परिणाम भोगण्यास सज्ज रहाण्याचा इशारा दिला. कारण अमेरिकेने आमच्या अणुकेंद्रावर हल्ले करून संपूर्ण सिमा ओलांडल्या आहेत त्यामुळे आम्हालाही आमचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे असा इशारा दिला.

त्यामुळे या युध्दावर योग्य तोडगा निघाला नाही तर भयावह परिणाम होवू शकतात.कारण इराण- इस्त्रायल युध्द व युक्रेन-रशिया युद्ध सध्याच्या परिस्थितीत थांबने शक्य नाही. परंतु अमेरिकेच्या इराणवरील हल्याने जगाला बेचैन केले असून तिसऱ्या महायुद्धाची घंटी वाजविल्याचे दिसून येते. डोनाल्ड ट्रम्पला वाटत असेल की हा अमेरिका, इस्त्रायल आणि जगासाठी ऐतिहासिक क्षण आहे परंतु ही बाब चुकीची आहे.

कारण युद्धामुळे अजून पर्यंत कोणालाच फायदा झालेला नाही उलट नुकसानच झाले आहे आणि आता अमेरिकेच्या इराणवरील हल्याने जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असून याचा गंभीरपणे परिणाम जगातील संपूर्ण देशांना भोगावे लागतील. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेऊन हे युध्द ताबडतोब थांबविले पाहिजे अन्यथा विनाश अटळ आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष "डोनाल्ड ट्रम्प जे बोलतात ते करीत नाही, आणि जे बोलत नाही ते करतात" त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प हे विश्वास पात्र नेता रहाले नाही. अमेरिका सध्याच्या परिस्थितीत स्वार्थी व व्यापारी देश बनला आहे. अमेरिकेने स्वतःच्या स्वाथार्साठी दिनांक १४ जून २०२५ ला असीम मुनीरला अमेरिकि सशस्त्र दलाच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते व सोबतच डोनाल्ड ट्रम्प यांचा ७९ वा वाढदिवस सुध्दा होता.

या निमित्ताने असीम मुनीरकडून इराणच्या अनेक महत्त्वपूर्ण ठिकाणांची व गुप्त माहिती अवगत केली.याचाही फायदा अमेरिकेने अवश्य घेतला असावा आणि असीम मुनीर पाकिस्तानला परत गेल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांना २०२६ चा नोबेल पुरस्कार देण्याची मागणी मिडियाच्या माध्यमातून केली आणि दुसऱ्याच दिवशी २२ जून २०२५ ला अमेरिकेने इराणवर बी-२ बॉम्बर विमानांनी अणू केंद्रांवर हल्ला केला. यामुळे सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तान अत्यंत कठीण परिस्थितीत फसल्याचे दिसून येते.

पाकिस्तानचे मित्र राष्ट्र चीन, इराण आणि वर्ल्ड बॅंकेकडुन कर्ज घेण्यासाठी अमेरिकेशी दोस्ती.त्यामुळे आता पाकिस्तान घर का ना घाट का अशी परिस्थिती झाली आहे. डोनाल्ड ट्रम्प ने स्पष्ट शब्दात सांगितले आहे की "आम्ही दोस्ती कोणाही सोबत फुकट करीत नाही". अमेरिकेला कल्पना होती की इराणचा खरा मित्र पाकिस्तान आहे. त्यामुळे अमेरिकेने इराणविषयी संपूर्ण गुप्त माहिती पाकिस्तान कडून हस्तगत केल्याचे स्पष्ट दिसून येते.

इराणला खाईत लोटण्याचे केले असेल तर पाकिस्ताननेच केले आणि ही बाब इराणच्याही लक्षात आली आहे. इराण व चीन पाकिस्तानला सुध्दा धडा शिकवु शकतो. या विनाशकारी महायुद्धाला संयुक्त राष्ट्रसंघाने, नाटो सह संपुर्ण देशांनी थांबवीण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, अन्यथा विनाश अटळ आहे. इराणने अमेरिकेसोबत बदला घेण्यासाठी कतर, बहरिन, इराक येथील अमेरिकनं एअर बेस वर इराणने १० बेलेस्टीक मिसाईल डागली असुन अमेरिकन हल्ल्याचा बदला घेतल्याचा दावा इराणने केला आहे.परंतु इराणने डागलेले १० मिसाईल अमेरिकेने उध्वस्त केल्याचा दावा पेंटागॉन मधुन करण्यात आला आहे.

यामुळे अमेरिकेन एअर बेसला कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही.युएई ने इराणच्या हल्ल्याची निंदा केली आहे.अमेरिका, रशिया, चीन, संयुक्त राष्ट्र यांनी एकत्र येऊन ताबडतोब युद्धविराम करावा.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

## वाचक लिहितात

### टीआरपी मागे माध्यमे का?

'श्री दाभोळकर हत्या आणि मी' या विक्रम भावे लिखित पुस्तकाचे नागपुरातील अमृत भवन येथे प्रकाशन झाले. विक्रम भावे यांना केवळ संशयाच्या आधारे अटक झाली होती. शेवटी न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली.

भावे यांना या काळात ज्या मानसिक यातना झाल्या, त्यांचं कौटुंबिक आयुष्य कसं उध्वस्त झालं! याविषयी लोकांना सांगण्यासाठी शेवटी पुस्तकच लिहावे लागले. हे त्यांच आत्मकथन आपल्याला अस्वस्थ करत. अगदी वडिलांचे निधन झालं असताना सुद्धा त्यांच्या अंत्य संस्काराला त्यांना जाता आलं नाही. कीती हा अन्याय! मी बरेचदा ऐकले आहे की, एखाद्या सराईत गुन्हेगाराला, खून्याला सुद्धा अशावेळी हजर करतात. मग इथेच का ही क्रूरता!

मुळातच हे सर्व वाचल्यावर लक्षात येतं की भावे हे या सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेचे बळी ठरले आहे आणि मीडियाने सुद्धा पक्षपाती भूमिका घेतली असेच लक्षात येते. हल्ली टीआरपी मागे माध्यमे धावतात, त्यात त्यांचे उत्पन्न वाढते, असे असले तरी त्यामुळे एखाद्याच्या आयुष्याची वाताहत होते हे त्यांना कसं लक्षात येत नाही! याला काय म्हणायचं!

त्यांना समाज मनाच्या सुखदुःखाशी काही देणे घेणे नाही का? टीआरपी सोडून मीडियाने बाजू मांडल्यास जनतेची अधिक विश्वास संपादन करेल, आणि कुणा निर्दोष व्यक्तिचा नाहक बळी जाणार नाही.

■ **सौ. माधवी पत्की**
**नागपूर.**

### प्रसार माध्यमांची भूमिका महत्त्वाची..

नुकताच नागपूर येथे दाभोळकर हत्या आणि मी या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचा कार्यक्रम झाला. कार्यक्रम पाहताना एका निर्दोष व्यक्तीवर झालेला अन्याय बघून मनात प्रचंड चीड निर्माण झाली.

या संपूर्ण प्रकरणात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची वाटली.

जेव्हा विक्रम भावे यांना केवळ संशयाच्या आधारावर अटक झाली, तेव्हा प्रसारमाध्यमांवर झालेल्या चर्चासत्रांमध्ये हिंदुत्ववादी विचारधारेला आरोपी असल्याचे दर्शविले. त्यांच्याविरोधात जनमत तयार करण्यात आले.

परंतु न्यायालयाने जेव्हा त्यांना निर्दोष घोषित केले, तेव्हा मात्र प्रसार माध्यमे लहानशी बातमी देऊन मोकळे झाले.

एका निर्दोष व्यक्तीला तीन वर्षे तुरुंगवास भोगावा लागला. त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला झालेला मनस्ताप आणि भोगाव्या लागलेल्या यातना, त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर शेवटचे दर्शनही मोबाईलवर घ्यावे लागले. त्यावेळीही प्रसारमाध्यमांनी कुठेही आवाज उठवला नाही. असे का? प्रसार माध्यमे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्यांनी निरपेक्षपणे बाजू मांडणे गरजेचे आहे ही सामान्य जनतेची अपेक्षा आहे.

■ **सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा.**

# दररोज ब्रेडचे सेवन आणि मेंदूच्या आजाराची शक्यता



धावपळीच्या जीवनात, ब्रेड हा सर्वात सोपा नाश्ता आहे. ब्रेड लवकर तयार होते आणि अनेक चवींमध्ये उपलब्ध असते, लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांची आवडती बनली आहे. आज बहुतेक लोक त्यांच्या सकाळची सुरुवात ब्रेड-जाम किंवा ब्रेड-बटर अशा नाश्त्याने करतात. परंतु सहज उपलब्ध आणि तयार होणारी ब्रेड अनेक समस्यांचे कारण देखील बनत आहे. तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की जे लोक दररोज ब्रेड खातात ते केवळ शारीरिकच नाही तर मानसिक आजारांनाही बळी पडू शकतात.

ब्रेडमध्ये असलेले उच्च ग्लायसेमिक इंडेक्स रक्तातील साखरेचे प्रमाण वेगाने वाढवू शकते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. ब्रेडमध्ये फायबर आणि व्हिटॅमिन ईची कमतरता असते, ज्यामुळे खराब कोलेस्ट्रॉल वाढू शकते आणि हृदयरोगाचा धोका वाढू शकतो.

ब्रेडमध्ये असलेले ग्लूटेन आणि रिफाइंड कार्ब्स बद्धकोष्ठता, पोटदुखी आणि अतिसार यासारख्या समस्या निर्माण करू शकतात. कॅलरीज आणि कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असल्याने, जास्त ब्रेड खाल्ल्याने वजन जलद वाढू शकते. याशिवाय, दररोज ब्रेड खाल्ल्याने यकृत आणि मूत्रपिंडांवर वाईट परिणाम होऊ शकतो. ब्रेडमध्ये अनेक प्रकारचे प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि रसायने मिसळली जातात, ज्यामुळे शरीराच्या पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो.

**मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम**

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या संशोधनातून असे दिसून आले आहे की दररोज ब्रेड खाल्ल्याने केवळ शारीरिकच नाही तर मानसिक आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. ब्रेडमध्ये असलेले रिफाइंड कार्ब्स आणि ग्लूटेनमुळे नैराश्य, ताण आणि एकाग्रतेचा अभाव यासारख्या मानसिक समस्या उद्भवू शकतात. सतत ब्रेड खाल्ल्याने शरीरात जळजळ देखील होऊ शकते, ज्यामुळे मेंदूच्या कार्य करण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

दररोज ब्रेड खाल्ल्याने ऑटो-ब्रूअरी सिंड्रोमचा धोका असतो. खरंतर, ब्रेड बनवण्यासाठी यीस्टचा वापर केला जातो. दररोज ब्रेड खाल्ल्याने पोटात यीस्टचे प्रमाण वाढू शकते. अशा परिस्थितीत, जेव्हा पोटात असलेले बॅक्टेरिया ब्रेडमध्ये असलेले कार्बोहायड्रेट्स पचवतात तेव्हा किण्वन होते, ज्यामुळे पोटात अल्कोहोल म्हणजेच इथेनॉल तयार होते. ज्यामुळे रुग्णाला अल्कोहोल न पिता नशेसारखे लक्षणे जाणवतात. हा एक प्रकारचा मानसिक आजार आहे, जो जास्त ब्रेड खाणाऱ्यांना होऊ शकतो.

■ ■ ■

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### स्कुल बॅग!

पाठ ठणके कंबर ठणके
दुखू लागलेत खांदे
दप्तराच्या ओझ्याने
आरोग्याचे झालेत वांदे..!

नाकापेक्षा मोती जड
अशी आहे वस्तुस्थिती
शासकांनो पर्याय काढा
करतो आम्ही विनंती!

विषयात करा कपात
युनिट नुसारच हवी
पुस्तके व वह्या
आमच्या दप्तरात..!

# महासागर

बुधवार दि. २५ जून २०२५

# खामगाव (बुलडाणा)

पान ६


## डिजिटल बोर्ड हटविण्याची मोहीम सुरू

**खामगाव (का.प्र.)** - शहरातील मुख्य रस्त्यांवरील डिजिटल बोर्ड हटविण्याची मोहीम नगर पालिकेच्या वतीने राबविण्यात येत असून काल रात्री काही भागातील डिजिटल बोर्ड काढण्यात आले. धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निमित्ताने शहरात डिजिटल बोर्ड लावण्यासाठी नगर पालिकेच्या वतीने ठराविक कालावधी साठी परवानगी दिली जाते. मात्र अनेक जण हा कालावधी संपूनही आपले बोर्ड काढून घेत नाहीत. सात दिवसांची परवानगी घेऊन महिनो महिने बोर्ड काढल्या जात नाहीत. दरम्यान नगर पालिका प्रशासनाच्या वतीने असे अनधिकृत डिजिटल बोर्ड हटविण्याची मोहीम राबविण्यात येत असून काल रात्री नांदुरा रोड वरील डिव्हायडरवर असलेल्या इलेक्ट्रिक पोल वरील डिजिटल बोर्ड काढण्यात आले. त्याच प्रमाणे इतरही काही भागात अशी कारवाई करण्यात आली. नगर पालिकेने हे बोर्ड जप्त केले आहेत. तरी अशा पद्धतीने बोर्ड लावणाऱ्यांनी परवानगीच्या आत आपले बोर्ड काढून घ्यावे, असे आवाहन न. प. च्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### स्वामी समर्थांच्या पादुका दर्शनाचा लाभ घ्यावा- आवाहन



**खामगाव** - श्री. स्वामी समर्थ भक्ताना समर्थांच्या पादुका दर्शनाचा योग जुळून आला आहे. २५ जून रोजी श्री. स्वामी समर्थ समाधी मठ येथील श्री. चोळप्पा महाराज यांचे ५ वे वंशज नितीन महाराज पुजारी हे श्री. स्वामी समर्थ महाराजांच्या मूळ पादुका पूजनासाठी हॉटेल रसिका इन शेगाव येथे येत आहेत. तरी ज्या स्वामी भक्तांना पादुका दर्शन घ्यायचे आहे त्यांनी हॉटेल रसिका इन, गजानन महाराज हॉस्पीटल शेजारी शेगाव येथे दुपारी ११ ते ३ या वेळेत दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

### गो. से. महाविद्यालयांमध्ये सौर ऊर्जा जनजागृती मोहिमेला उस्फूर्त प्रतिसाद

**खामगाव** - महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणारा करिअर कट्टा हा उपक्रम या उपक्रमांतर्गत करिअर कट्टा सोलार एनर्जी सोसायटी ऑफ इंडिया व विवा कॉलेज विरार यांचे संयुक्त विद्यमाने संपूर्ण महाराष्ट्रभर २१ व २२ जून २०२५ रोजी सौरऊर्जा जनजागृती मोहीम राबविली गेली बुलढाणा जिल्ह्याचे करियर कट्टा जिल्हा समन्वयक डॉक्टर विद्याधर आठवर व गोसे महाविद्यालयाचे महाविद्यालयीन समन्वयक प्राध्यापक अक्षय सिडाम व संदीप शिंदे यांनी अथक परिश्रम घेतले महाविद्यालयामधून सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदविला करिअर कट्टा व सौर ऊर्जा सोसायटी द्वारे संपूर्ण महाराष्ट्र मधून सुमारे ५५ हजार ५५५ विद्यार्थ्यांची एकाच वेळी परीक्षा घेऊन जनजागृती करण्याचा हा मानस पूर्ण करण्याकरिता करिअर कट्टा ॲप डाऊनलोड करणे व त्यामधून सदर परीक्षा देणे याबाबत संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली होती काही तंत्रिक अडचणीमुळे ॲप मध्ये विद्यार्थ्यांना अडचणी निर्माण झाल्या त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून गुगल फॉर्म द्वारा सुद्धा सदर परीक्षा घेण्यात आली.

### गर्दे वाचनालयात योग दिवस साजरा

**बुलडाणा** - गर्दे वाचनालयात शनिवार २१ जून रोजी सकाळी वाजता आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रामुख्याने ेगशिक्षक श्रीपाद कलंत्री, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाचे धनंजय मऱ्हे साहेब, गर्दे वाचनालयाचे उपाध्यक्ष बाबासाहेब वरणगांवकर, ग्रंथपाल नेमीनाथ सातपुते, महात्मा फुले वाचनालयाचे अध्यक्ष हरिभाऊ कुकडे, जिजाऊ वाचनालयाचेग्रंथपाल नारायण खर्चे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे राजेंद्र साबळे,प्रगती सार्वजनिक वाचनालयाचे रविकिरण टाकळकर प्रा.डॉ. भगवान गरुडे, गर्दे वाचनालयाचे कर्मचारी सचिन बल्लाळ, अनिल पालकर तथा योगविद्याधाम बुलढाणाचे सदस्य ॲड.श्रीकर व्यवहारे, राजेंद्र धोंडगे, सुनील नागपुरे, दत्तात्रय जाधव, अनिल वडतकर, शिवप्रसाद बोरखेडे, गोपाल भाग्यवंत, निलेश सोनूने, पवन जंगले, नामदेव जवरे, विशाल ठाकूर, प्रकाश सातव यांनी सहभाग घेतला. आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त योगविद्याधाम चे सदस्यांनी ५१ सूर्य नमस्काराचा संकल्प करून यशस्वीपणे पूर्ण केला. यावेळी प्रशिक्षक श्रीपाद कलंत्री यांनी उपस्थित योगसाधकांना मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाचे धनंजय मऱ्हे तथा गर्दे वाचनालयाचे उपाध्यक्ष बाबासाहेब वरणगांवकर यांनी योगशिक्षक श्रीपाद कलंत्री यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार ग्रंथपाल नेमिनाथृ सातपुते यांनी मानले.

### गो. से. महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय ऑलंपिक दिवस साजरा

**खामगाव** - स्थानिक विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय खामगाव येथे २३ जून रोजी स्व.शंकरराव बोबडे सभागृह येथे आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक डे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर तर प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून खामगाव तालुका क्रीडा अधिकारी लक्ष्मीशंकर यादव व प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. एस.डी.वाघ कनिष्ठ महाविद्यालय इन्चार्ज यांची उपस्थिती होती.

सदर कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शनपर बोलताना तालुका क्रीडा अधिकारी लक्ष्मीशंकर यादव यांनी विद्यार्थ्यांना आजच्या दिवसाचे महत्व, खेळाचे व आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. आरोग्य हेच धनसंपदा असा र्मिक संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. अध्यक्षिय भाषणामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांनी विद्यार्थ्यांना निरोगी शरीरात निरोगी मन वास करते म्हणून आपले शरीर आणि मन जर निरोगी असेल तर शरीर सुदृढ व निरोगी बनते असा संदेश त्यांनी दिला. तसेच किमान काही वेळ आपण मोबाईल दूर ठेवून तो वेळ व्यामासाठी धावा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून आज कनिष्ठ महाविद्यालयाचा सत्राचा पहिला दिवस या निमित्त तालुका क्रीडा अधिकारी यांनी पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी प्रा.डॉ.अर्चना कुलकर्णी प्रा.अशोक ढाले प्रा. योगेश टापरे प्रा. धर्मराज मोगल प्रा.पल्लवी खरात प्राध्यापक श्वेता कदम प्रा. आदर्श जगतापप्रा.धीरज मोहिते व शिक्षकेतर कर्मचारी अभय मोहिते यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## शेतकऱ्यांना कर्ज न देणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर कारवाई करणार - ना. आकाश फुंडकर

### शासन निर्णयानुसार तालुका स्तरीय पिक कर्ज वाटप आढावा

**खामगाव (उमाका)** - समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. स्थानिक विधानसभा सदस्य हे सदर समितीचे अध्यक्ष असतात, तर सहायक निबंधक, सहकारी संस्था, हे सदस्य सचिव असतात. राज्यातील शेतकऱ्यांना निर्धारित लक्षांकाप्रमाणे बँकांमार्फत पुरेशा प्रमाणात व विहित वेळेत पीक कर्जपुरवठा होण्यासाठी नियोजन करणे तसेच त्यासंबंधाने आवश्यक दिशानिर्देश देण्याचे काम या समिती मार्फत करण्यात येते. दरम्यान काल ना. ॲड. आकाशदादा फुंडकर साहेब, कामगार कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली खामगाव येथे तालुका स्तरीय पीक कर्ज वाटप आढावा सभा उपविभागीय कार्यालयात संपन्न झाली. सदर सभेत खरीप पीक कर्ज वाटप बाबत खामगाव तालुक्यातील सर्व बँकांचा शाखानिहाय आढावा घेण्यात आला. खामगाव तालुक्यासाठी या खरीप हंगामा करिता १६३ कोटी रुपये कर्जावाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.



तथापि अद्यापही कर्जवाटप मात्र १७.६८ टक्के करण्यात आले असल्यामुळे मंत्री महोदयांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पुढील आठवड्यात ही टक्केवारी ५० टक्क्याच्यावर कशी जाईल यासाठी बँकांनी नियोजनबद्ध उपाययोजना करण्याचे त्यांनी निर्देश दिले. पात्र शेतकऱ्यांना कर्ज वाटपात कुचराई करणाऱ्या बँक अधिकाऱ्यावर कारवाई प्रस्तावीत करण्यात येईल, असा इशारा यावेळी त्यांनी दिला. शासन अनुदान / नुकसान भरपाईची रक्कम प्राप्त झाली असल्यास या स कोणत्याही परिस्थितीत होल्ड लागणार नाही किंवा सदरची रक्कम पिक कर्ज खात्यात वळती केली जाणार नाही, याचीही बँकांना दक्षता घेण्याचे सूचित केले. त्याच प्रमाणे वर्ग - २ च्या शेत जमीनीसही कर्ज वाटप करणेबाबत शासन निर्णय असल्याने सदर शेतकऱ्यांना कर्ज वाटप करणेबाबत सुचना दिल्या. कर्ज वाटपास येणाऱ्या अडचणी काय आहेत याबाबत बँक व्यवस्थापक यांच्या समस्या सुद्धा त्यांनी जाणून घेतल्या. सभेस उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी, उपविभागीय कृषी अधिकारी बी. जी. व्यवहारे, तहसीलदार सुनिल पाटील, सहाय्यक निबंधक शुकदास गारोळे, जिल्हा अग्रणी प्रबंधक ए. के. सिंग, तालुका कृषी अधिकारी पवार, नायब तहसीलदार विजय पाटील, सहकार अधिकारी खराटे, सहकार अधिकारी गोपाल दहिभात आणि सर्व बँकांचे व्यवस्थापक हजर होते.

## शेगाव नगर परिषद योग दिवस उत्साहात साजरा

**शेगाव (महासागर प्रतिनिधी)** राष्ट्रमाता इंदिरा गांधी नगर परिषद विद्यालयांमध्ये २१ जून हा जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला.



यावेळी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी आदरणीय काटकर मॅडम तसेच उपमुख्य अधिकारी पाटील व प्रशासनाधिकारी डिगोळे, हिवाळे यांची उपस्थिती होती. यावेळी नगरपरिषद कार्यालयाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते व विविध विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक यांची सुद्धा या ठिकाणी उपस्थिती होती होती. मुरारका महाविद्यालयाचे योगशिक्षक प्रा. डॉ. विलास डेहनकर व रवींद्र हेलोडे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले . कार्यक्रमाचे आयोजन आणि यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक , सुरजुसे, घनोकार, सौ. डेहंनकर , सौ.अंबरकर, कोल्हे यांनी परिश्रम घेतले.

## राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त ''सामाजिक न्याय दिन'' उत्साहात साजरा होणार

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शासन निर्णयानुसार २६ जून हा दिवस ''सामाजिक न्याय दिन'' म्हणून साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने यंदा २६ जून रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिवशी समता दिंडीचे भव्य आयोजन करण्यात आले असून, सकाळी ८ वाजता जिल्हा परिषद, बुलढाणा येथून या दिंडीला प्रारंभ होणार आहे. शहरातील मुख्य मार्गाने ही दिंडी फिरून पुन्हा जिल्हा परिषद कार्यालयात समारोप होईल. सामाजिक समतेचा संदेश देणारी ही दिंडी सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्यानंतर, सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, त्रिशरण चौक, चिखली रोड, बुलढाणा येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात सामाजिक न्याय, समता आणि प्रगतीच्या विषयावर मार्गदर्शनपर विचार मांडले जाणार आहेत. ''समतेचा जयघोष, सामाजिक न्यायाचा संकल्प'' या भावनेतून सर्व नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन करावे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त भाऊराव रामसिंग चव्हाण यांनी केले आहे.

## बुलढाण्यात उद्या पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - जिल्हातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर बुलडाणा आणि जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा संयुक्त विद्यमाने पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन गुरुवारी २६ जून रोजी जिजामाता महाविद्यालय,बुलढाणा येथे करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यामध्ये उत्कर्ष स्मॉल फायनान्स्? बॅंक, बुलढाणा, सहयोग क्रेडीट कॉपरेटीव्ह सोसायटी, बुराड ॲग्रो फुड, बुलढाणा क्रेडीट आक्सेस ग्रामीण कोटा, बुलढाणा, हेंड सुझुकी, बुलढाणा व जय हिंद प्रा.पुणे या सारख्या नामांकित उद्योजकांनी त्यांच्याकडील रिक्त पदे अधिसुचित केलेली आहे. सदर कार्यालयाकडे नोंदणीकृत उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्यात नामांकित कंपनी प्रतिनिधीद्वारे गरजू व रोजगार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेवून त्यांची प्राथमिक निवड करण्यात येणार आहे. तसेच नामांकित कंपनीमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी या मेळाव्याद्वारे उपलब्ध होणार आहे. १० वी, १२ वी, आय टी आय पदवीधर पुरुष महिला उमेदवारांनी दि.२६ जून रोजी जिजामाता महाविद्यालय बुलढाणा जि. बुलढाणा येथे प्रत्यक्ष उपस्थित राहुन सहभागी होऊन रोजगार प्राप्त करण्याची संधी उपलब्ध झालेली आहे.

पात्र, गरजू व नौकरी इच्छुक उमेदवार आपल्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे एकापेक्षा जास्त पदाकरीता सुध्दा मुलाखत देऊ शकतात, तरी दि.२६ जून रोजी जिजामाता महाविद्यालय बुलढाणा येथे आवश्यक त्या कागदपत्रांसह सकाळी १० वाजता स्वखर्चाने उपस्थित राहुन आपली नाव नोंदणी करावी आणि उपस्थित कंपन्याच्या प्रतिनिधी समवेत मुलाखत द्यावी. बुलढाणा जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारानी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग.प्र. बिटोडे यांनी केले आहे

याबाबत काही अडचण आल्यास जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बुलडाणा या कार्यालयाच्या (०७२६२-२४२३४२) या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

## कारमधून दोन लॅपटॉप लंपास

**शेगाव (महासागर प्रतिनिधी)** - संत श्री गजानन महाराज मंदिर परिसरातील पार्किंग मध्ये उभ्या केलेल्या कार मधून दोन लॅपटॉप चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मुकुंद रमाकांत विचूनकर (६१). रा. सिडको, छत्रपती संभाजीनगर हे कुटुंबासह १४ जून रोजी शेगाव येथे दर्शनासाठी आले होते. यावेळी त्यांनी पार्किंग मध्ये उभ्या केलेल्या कारमधून अज्ञात चोरट्याने दोन लॅपटॉप लंपास केले. याबाबत त्यांनी शहर पोस्टेला तक्रार दिली असून त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध कलम ३०३ (२) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.


नियमित वाचा महासागर


## विद्यार्थ्यांची बैलगाडीत बसवून गावाभर मिरवणूक काढत शाळा प्रवेशोत्सव

**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)**- दोन महिन्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर २३ जून रोजी शाळेची पहिली घंटा वाजली. सुनगाव येथील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा तसेच उर्दू प्राथमिक शाळेमध्ये येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन शिक्षक पालक व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने मोठ्या उत्साहपुर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना गावातील शेतकरी उमाळे यांच्या सजवलेल्या बैलगाडी मध्ये बसवून जामोद केंद्राचे केंद्रप्रमुख नितीन सातव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किशोर धुळे, जि.प.मराठी शाळा मुख्याध्यापक रवींद्र राखोंडे, उर्दू प्राथमिक शाळा



मुख्याध्यापक शेख मजहर, बालरोग तज्ञ शालिग्राम कपले, ग्रामपंचायत सदस्य सौ.कुरवाडे, मुस्ताक अतारी, गावकरी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांची गावभर मिरवणूक काढत शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी या विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.तसेच विद्यार्थ्यांकरिता मध्यान्न भोजनामध्ये खिचडीसह गोड पदार्थ म्हणून जेलेबी देण्यात आली. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके आणि शुजचे वाटप केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसुन आला. विद्यार्थ्यांचे हित हे प्रथम कर्तव्य असून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे हे आमची मुख्य उद्दिष्ट आहे अशी शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र राखोंडे यांनी दिली. यावेळी उर्दू शाळा मुख्याध्यापक शेख मजहर यांचेसह जि.प.मराठी शाळेचे शिक्षक प्रदीप वाकेकर, खिरोडकर सर,बेग सर, अस्मिता क्षिरसागर, गवई मॅडम, बोंबटकर मॅडम, साबे मॅडम,अंबडकार सर, पठाडे सर,बुटे सर, पत्रकार अनिल भगत यांची उपस्थिती होती

## कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केली काजेगावात पेरणी



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** - काजेगाव ता. जळगाव (जा.) येथे स्वा. गं.ई. कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शेती चे नियोजन आखून पेरणी प्रक्रिया ग्रामीण शेतकरी वर्गा सोबत पार पाडली. गावात जवळपास ३०-४० टक्के पेरणी आटोपात आली आहे.

पेरणी चे नियोजन कपिल जगदेव वानखडे व जगदेव तुकाराम वानखेडे याच्या शेतात केल्या गेले. नियोजण करतांना शेतात तुर व सोयाबिन पेरण्यात आले. पारंपारीक शेती द्वारे हि पेरणी बैल जोडी व शेतकऱ्यांच्या मदतीने करण्यात आली.

नियोजन हे कृषी विद्याथी भुषण गिरी, राहुल चौधरी, अक्षय फदाट, निखिल गिरहे दिपक हेंबाडे, व क्रिष्णा पाचरणे द्वारे करण्यात आले.'' योग्यवेळी केल्या गेलेली पेरणी ही योग्य वेळी नफादायक ठरते'' यावर महाविद्यालयातील विद्यार्थानी शेतकच्यांशी संवाद साधुन चर्चा केली व मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांशी विचार मांडताना गावकऱ्याशी सुद्धा संवाद साधल्या गेला व शेती बद्दल माहीती सांगण्यात आली.

## अथक परिश्रम विद्यार्थ्यांचे यशाची गुरुकिल्ली - प्राचार्य अशोक थोटांगे

**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी)**: जिद्द,चिकाटी आणि महत्वाकांक्षा ही त्रिसूत्री जर विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगिकारली तर तो विद्यार्थी आपल्या आयुष्यात पूर्णतः यशस्वी होतो. कारण यशाला कोणताही शॉर्टकट नसून कठोर परिश्रमाशिवाय गत्यंतर नसल्याचे प्रतिपादन प्राचार्य भाऊसाहेब थोटांगे यांनी केले. येथील संत गुलाबबाबा विद्यालय व न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूल मध्ये नवोदित विद्यार्थी प्रवेश उत्सव सो-हळा पार पडला त्या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष पुंडलिकराव रहाटे, तर कार्याध्यक्ष पद्माकर मारोडे, शारीरिक शिक्षण शिक्षक सुधीर मानकर, सचिव गो.पू.रहाटे, विजय राजनकर, पालक प्रतिनिधी विलास सुलताने, सागर ससाने, आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी चालू शैक्षणिक सत्रात नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना शालेय आवरत ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत आणून त्यांच्या हाती गुलाब पुष्प देऊन त्यांचे औक्षण करण्यात आले आणि विद्यार्थ्यांना मिठाई,मिष्ठान्न आणि नवीन पुस्तकांचे वर्ग निहाय संच वाटप करण्यात आले.

### जाहीर नोटीस

**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदुरा, जि.बुलडाणा**

एम.जे.सी. नं. १४८/२५

एफएफ नं. १६/७/२०२५

अर्जदार करीता अधिवक्ता- ॲड. ए.पी. पाटील

अर्जदार- १. नर्मदा गजानन बाठे, २. अक्षय गजानन बाठे, ३. विशाल गजानन बाठे नं. १ ते ३ रा. धाडी ता. नांदुरा जि. बुलडाणा, ४. सौ. श्रुती शिवाजीराव मानकर रा. खडदगाव ता. नांदुरा जि. बुलडाणा

विरुध्द. -गैरअर्जदार कोणी नाही

अर्ज :-मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट (वारस हक्काचे प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील गजानन नारायण बाठे हे धाडी येथील रहिवाशी होते व ते दिनांक १५.०१.२०२५ रोजी धाडी येथेच मयत झाले आहेत. मयत गजानन नारायण बाठे हयांना त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार हेच कायदेशिर वारस असल्याबाबतच्या वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार हयांनी वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी ह्या न्यायालयात अर्ज केला आहे. त्या अर्जाची सुनावणी ता.१६/७/२०२५ रोजी १०-३० वाजता होईल. तरी या जाहीर नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, सदर प्रकरणी ज्यांना काही हरकती, आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी वरील तारखेस किंवा सदर नोटीस स्वतः अगर प्रकाशित झाल्यापासुन ३० दिवसाचे आत वि. न्यायालयात वकीलांमार्फत हजर राहून त्यांचे आक्षेप, हरकती सादर करावे. अन्यथा कोणाचीही काहीही आक्षेप, हरकत नाही असे समजुन अर्जदारांना वारस हक्क प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि ५/५/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

(शिक्का)

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
नांदुरा, जि.बुलडाणा


RNINo-MAHMAR 2010/35857 महासागर खामगांव(बुलढाणा)

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलढाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

# १२ वर्षीय विराजमध्ये विशेष टॅलेंट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

तो गाणं गातो, स्टॅण्ड-अप कॉमेडी करतो, कविता करतो, उत्तम वक्ता आहे, अभ्यासातही हुशार आहे. विशेष म्हणजे इतरांना प्रेरणा देण्यासाठी ऑनलाईन सेशन्सही घेतो.

वय फक्त १२ वर्षे. कमालीची जिद्द आणि अफलातून इच्छाशक्तीच्या जोरावर विराजने दिव्यंगत्वावर मात करीत इतरांसाठी आदर्श निर्माण केला. विराजच्या या विशेष टॅलेंटचं केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरींनी कौतुक केले.

विराजने अलीकडेच त्याच्या आई (चैताली) आणि मोठ्या भावासोबत (शंतनू) गडकरी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. विराजमध्ये असलेल्या अफलातून क्षमता बघून गडकरींनीही आश्चर्य व्यक्त केलं.

वाशीमच्या एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलेल्या विराजच्या वाट्याला जन्मापासूनच संघर्ष आला. त्याचा जन्म झाला तेव्हा त्याला काहीतरी दिव्यंगत्व असेल, अशी शंका आईला आली. पण डॉक्टरांनी त्यावर शिक्कामोर्तब केले नव्हते.

आईनं जिद्द सोडली नाही. त्यांनी दवाखाने पालथे घातले आणि विराजला स्कोलियोसिस आणि हिप डिसलोकेशन असल्याचे निष्पन्न झाले. पाठीचा कणा वाकलेला असल्याने त्याला सरळ उभं राहण्याचा तर प्रश्न उद्भवणार होताच. शिवाय या त्रासामुळे त्याचे दोन्ही पाय समान नाहीत. त्यामुळे चालतानाही त्रास होणारच होता.

वयाच्या दुसऱ्या वर्षापासून तर बाराव्या वर्षापर्यंत त्याच्या वेगवेगळ्या तीन शस्त्रक्रिया झाल्यात. आज तो



गडकरींकडून कौतुक

बेल्टच्या आधाराने सरळ उभा राहू शकतो आणि एका पायातील मोठ्या बुटाच्या आधाराने चालूही शकतो. या प्रवासात त्यांचे फॅमिली फिजिशियन आणि प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. गिरीश चरडे यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

मात्र, विराजचे दिव्यंगत्व ही त्याची कहाणी नाही. तर या दिव्यंगत्वावर मात करून त्याने निर्माण केलेली स्वतःची ओळख विशेष ठरते. कविता वाचन-लेखन, स्टॅण्ड-अप कॉमेडी, वक्तृत्व, हस्तकला, गायन, जलतरण, बुद्धीबळ आदींमध्ये प्राविण्य सिद्ध करून त्याने अनके राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पुरस्कारावर मोहर उमटवली आहे.

रामानुजम मॅथ्स कॉन्टेस्ट, आंतरराष्ट्रीय टॅलेंट सर्च, सायन्स ऑलिम्पियाड यासारख्या प्रतिष्ठीत स्पर्धांमध्ये विराजनं कमावलेलं यश त्याच्यातील टॅलेंट अधोरेखित करणारं ठरलं आहे.

दोन वर्षांपूर्वी विराजने लिहिलेले बियाँड डिसअॅबिलिटी हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यालाही अनेक पुरस्कार मिळाले. नॅशनल चाईल्डलाईन १०९८ बाबत जनजागृती करण्याचा विराजने विडा उचलला आहे. त्यासाठी तो समूपदेशन कार्यक्रम करतो.

सार्वजनिक ठिकाणी, शाळांमध्ये किंवा कुटुंबात देखील कुठल्याही प्रकारचा अन्याय होत असेल तर मुलं स्वतः या चाईल्डलाईनचा वापर करू शकतात, हे तो शाळा-शाळांमध्ये, स्वयंसेवी संस्थांमध्ये जाऊन सांगतो. त्याला चाईल्डलाईनचा ब्रॅण्ड-अॅम्बेसिडर करावे, अशी मागणी त्याच्या आई चैताली यांनी गडकरी यांच्याकडे केली आहे.

विराजचे लवकरच एक कवितेचे पुस्तकही प्रकाशित होणार आहे. त्याच्या एकूणच संघर्षमय प्रवासाचे आई आणि मोठा भाऊ सहप्रवासी आहेत. विराजच्या प्रत्येक पावलावर त्यांची साथ लाभते. अवघ्या बाराव्या वर्षी त्याने केलेली किमया त्याच्या घरी पुरस्कारांनी सजलेल्या कोपऱ्यावरून लक्षात येते. गडकरी यांनी विराजला यश प्राप्त करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## निवडणुकीची वाट बघत बसू नका...
# शेतकरी कर्जमाफीसाठी हीच योग्य वेळ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :



राज्यातील शेतकऱ्यांवर सध्या असलेले खतांचे संकट, आर्थिक अडचणी आणि नैसर्गिक आपत्तींमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवरून माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे नेते अनिल देशमुख यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

अनिल देशमुख म्हणाले की, शेतकरी मोठ्या अडचणीत असून, हीच कर्जमाफीसाठी योग्य वेळ आहे. सरकारने निवडणुकीची वाट न पाहता तत्काळ निर्णय घ्यावा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याआधी योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णय घेऊ असे विधान केले होते, त्यावर देशमुख यांनी ही प्रतिक्रिया दिली.

अनिल देशमुख म्हणाले की, राज्यात पेरण्यांचे काम सुरू असून, शेतकऱ्यांना रासायनिक खत, डीएपी आणि मिश्र खतांचा पुरवठा अपुरा पडत आहे. मागणीच्या तुलनेत फक्त 30 टक्केच डीएपी खत पुरवले जात आहे, अशी माहिती समोर आली आहे. परिणामी, शेतकरी मोठ्या संकटात आहे.

**जाहीरनाम्याची करुण दिली आठवण**

अनिल देशमुख म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांची योग्य वेळ ही नक्की कधी येणार? विधानसभा निवडणुकांच्या आधी आपल्या जाहीरनाम्यात आपण वचन दिलेले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात आपण जाहीर भाषणे सुद्धा केली आहेत. पण आपले उपमुख्यमंत्री अजित पवार असे आश्वासन दिले नाही असे म्हणतात असे म्हणत शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरुन निशाणा साधला आहे.

खतांच्या दरात वाढ झाल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठे आव्हान समोर उभे आहे. यामुळे सरकारने तातडीने खताचा पुरवठा सुरळीत करावा, दर नियंत्रणात आणावेत आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत ठोस निर्णय घ्यावा, असेही ते म्हणाले.

**काही आमदार असमाधानी**

अनिल देशमुख म्हणाले की, शरद पवार यांना सोडणे ही आमची मजबुरी होती. काही ज्येष्ठ नेत्यांनी विपरीत परिस्थितीत निर्णय घेतल्याचे खाजगीत मान्य केले आहे. याच पार्श्वभूमीवर अजित पवार गटातील काही आमदार सत्तेत असूनही समाधानी नाहीत.

भास्कर जाधव आमच्या पक्षातील प्रदेशाध्यक्ष होते. ते शरद पवार यांची साथ सोडायला नको होती असे म्हणतात. शरद पवार यांची साथ ज्यांनी ज्यांनी सोडली, ते जेव्हा आम्हाला एकांतात भेटतात, तेव्हा ते सांगतात की आम्हाला साथ सोडायला लावली परिस्थिती तशी नसती तर आम्ही शरद पवारांची साथ सोडली नसती, अशी प्रतिक्रिया देशमुख यांनी जाधव यांच्या नाराजीविषयी बोलताना दिली.

## जून महिन्यात विक्रमी पाऊस

■ **नाशिक** : यंदाच्या जून महिन्यात नाशिक शहर आणि जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसाने गेल्या दहा वर्षांतील सर्व विक्रम मोडीत काढले असून, अवघ्या महिनाभरात तब्बल 439 मिमी पावसाची नोंद झाली आहे.

सलग कोसळणाऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील धरणांमध्ये जलसाठा झपाट्याने वाढला असून, गंगापूरसह अनेक धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे गोदावरीला आठवडाभरात दुसऱ्यांदा पूर परिस्थिती निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. नाशिक शहरातील अनेक ऐतिहासिक मंदिरे आणि घाट पाण्याखाली गेली आहेत.

सध्या नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात पावसाची संततधार सुरू असून, हवामान खात्याने पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहील असा अंदाज आहे.

# प्रणय जनबंधू पहिल्याच प्रयत्नात फ्लाईंग ऑफिसर

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २४ :

आय.आय. टी. रुडकी येथून बी. टेक झालेला आणि बंगळुरू येथील खासगी कंपनीत कर्तव्यावर असलेल्या चंद्रपूरचा सुपूत्र प्रणय जितेंद्र जनबंधू याने एअर इंडियात फ्लाइंग ऑफिसर या पदासाठी पात्रता मिळवली आहे. प्रणय फ्लाइंग ऑफिसर झाल्याने त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रणय जनबंधू याने आपल्या अथक परिश्रमाच्या जोरावर भारतीय वायुसेनेत स्थान मिळवले आहे. त्याची फ्लाइंग ऑफिसर या मानाच्या पदासाठी निवड झाली आहे. त्यांच्या रुपाने चंद्रपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

प्रणय जनबंधू हा चंद्रपूर शहरातील पडोली परिसरातील साई रेसिडेन्सी येथील रहिवासी आहे. त्याचे वडील जितेंद्र जनबंधू आणि आई नीता जनबंधू हेही समाजसेवेत सक्रिय आहेत. प्रणय



याचे दहावीपर्यंतचे शिक्षण सेंट मेरी हायस्कूल दुर्गापूर येथे झाले. बारावीचे शिक्षण आयआयटी होम नागपूर येथून पूर्ण केले.

त्यानंतर त्यांने आयआयटी रुडकी (उत्तराखंड) येथून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये बी.टेकची पदवी प्राप्त केली. बंगळुरू येथील खासगी कंपनीत नोकरी करत असतानाच प्रणयने भारतीय वायुसेनेच्या एएफसीएटी (एअर फोर्स कॉमन अॅडमिशन टेस्ट) या अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेची तयारी सुरू केली. पहिल्याच प्रयत्नात उल्लेखनीय यश संपादन केले.

एएफसीएटी परीक्षेत त्याने २ एएफएसबी मैसूर या निवड मंडळातून सहभागी होत ऑल इंडिया रँकिंगमध्ये एअर ७९ प्राप्त करत फ्लाइंग ऑफिसर या पदासाठी पात्रता मिळवली.

कोणतेही कोचिंग न घेता, केवळ स्वतःच्या प्रयत्नांच्या आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश आहे. त्याच्या या यशाची दखल घेत सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन केले जात आहे.

## प्रसिद्धीच्या भावनेतून राहुल गांधींचे फडणवीसांवर आरोप

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभा मतदारसंघात अवघ्या पाच महिन्यांत तब्बल ८ टक्के मतदार वाढल्याचा आरोप करत भाजपवर निवडणूक प्रक्रिया बिघडवल्याचा ठपका ठेवला.

या आरोपांवर भाजपचे विधान परिषदेचे आमदार प्रसाद लाड यांनी जोरदार प्रत्युत्तर देत काँग्रेस आणि राहुल गांधींवर चांगलाच हल्ला चढवला. आरोपांमध्ये राहुल गांधींची वैफल्यग्रस्तता दिसते, अशी टीका प्रसाद लाड यांनी केली आहे.

राहुल गांधी आणि काँग्रेस जनतेची दिशाभूल करत आहेत. आरोप करणाऱ्यांना मनोरुग्ण रुग्णालयात नेले पाहिजे, असा टोलाही प्रसाद लाड यांनी राहुल गांधी यांना लगावला आहे.

: मुलखांवेगळी माणसं :

# मानवी शरीराचे अवयव ओळखण्याचा जागतिक विक्रम




**लोकमानस**

तामिळनाडूतील तंजावर येथील आद्रिका विवेक नावाच्या चिमुकलीने एका असाधारण कामगिरीत ३० सेकंदांच्या कालावधीत मानवी शरीराचे जास्तीत जास्त अवयव ओळखण्याचा विश्वविक्रम केला आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी २४ ऑगस्ट २०२३ रोजी घडली, जेव्हा २ वर्षे, ४ महिने आणि २७ दिवसांच्या कोवळ्या वयात आद्रिकाने २२ मानवी शरीराचे अवयव ओळखले. या उत्कृष्ट कामगिरीला वर्ल्डवाइड बुक ऑफ रेकॉर्ड्सने मान्यता दिली आहे, ज्यामुळे इतिहासात आद्रिकाचे स्थान मजबूत झाले आहे.

यापूर्वी १ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्रातील पुणे येथे मानवी शरीराचे बहुतेक अवयव ओळखणारा सर्वात लहान मुलगा विरेनने १ वर्ष ९ महिन्यांच्या वयात १ मिनिट १६ सेकंदात २२ मानवी शरीराचे अवयव ओळखून जागतिक विक्रमांच्या पुस्तकात एक विक्रम नोंदवला आहे. त्यांनी १ वर्ष ९ महिन्यांच्या वयात १ मिनिट १६ सेकंदात २२ मानवी शरीराचे अवयव ओळखले आणि जागतिक रेकॉर्ड बुकमध्ये एक विक्रम नोंदवला.

ज्ञान आणि संज्ञानात्मक क्षमतेचे मंत्रमुग्ध करणारे प्रदर्शन करून आद्रिका विवेकची असाधारण प्रतिभा दाखवण्यात आली. अवघ्या ३० सेकंदात, आद्रिकाने मानवी शरीराच्या विविध अवयवांची सहज ओळख करून दिली, ज्यामुळे प्रेक्षकांना आश्चर्यचकित केले.

तपशीलांकडे पाहण्याच्या उल्लेखनीय नजरेने, तिने डोके, डोळे, नाक, तोंड, कान, हात, पाय, बोटे आणि पायाची बोटे अशा विविध शरीराच्या भागांची अचूक नावे दिली. इतक्या लहान वयात तिच्या असाधारण संज्ञानात्मक विकासातून तिची जन्मजात बुद्धिमत्ता आणि ज्ञानाची तहान दिसून आली.

३० सेकंदांच्या कमी कालावधीत सर्वाधिक मानवी शरीराचे अवयव ओळखून इतिहासात तिचे स्थान मजबूत करून, वर्ल्डवाइड बुक ऑफ रेकॉर्ड्सने आद्रिका विवेकच्या कामगिरीला योग्य मान्यता दिली आहे. हा अविश्वसनीय विक्रम मानवी कामगिरीच्या इतिहासात कायमचा कोरला जाईल. केवळ ३० सेकंदात मानवी शरीराचे जास्तीत जास्त अवयव ओळखण्याचा आद्रिका विवेकने मिळवलेला जागतिक विक्रम हा एक उल्लेखनीय पराक्रम आहे. तिच्या अपवादात्मक संज्ञानात्मक क्षमता आणि ज्ञानाची तहान तिला इतिहासाच्या इतिहासात घेऊन गेली आहे. ही कामगिरी पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाजाला तरुण मनांच्या क्षमतेचे संगोपन आणि विकास करण्यासाठी प्रेरणा देणारी ठरते.

■ ■ ■

## डिफेंडरचे साहसवीरांना आवाहन

डिफेंडर एका नवीन प्रकारच्या स्पर्धेत उतरण्यासाठी साहसाची अविश्वसनीय भावना असलेल्या व्यक्तींचा शोध घेत आहे. नवीन डिफेंडर ट्रॉफी भूतकाळातील ट्रॉफी आणि चॅलेंज इव्हेंट्सपासून प्रेरित आहे. परंतु प्रशिक्षण आणि स्पर्धेच्या तीन कठीण फेऱ्यांमध्ये स्वतःचा वारसा निर्माण करेल.

केवळ अशक्य गोष्टींना स्वीकारणाऱ्या आणि जागतिक संवर्धनाची आवड असलेल्यांनाच अर्ज करता येणार आहे. डिफेंडर हा दशकांपासून शोधक आणि मोहीम नेत्यांच्या पसंतीच वाहन आहे आणि नवीन जागतिक उपक्रम ५० हून अधिक देशांमध्ये प्रवेशिका आमंत्रित करत आहे.

स्थानिक निवडी या उन्हाळ्यात सुरू होतील, पुढील वसंत ऋतूमध्ये राष्ट्रीय अंतिम फेरीत कोण पोहोचेल हे ठरवले जाईल. २०२६ मध्ये आफ्रिकेत डिफेंडर संवर्धन भागीदार टस्कसह आयोजित जागतिक अंतिम फेरीत कोण पोहोचेल याबद्दल जगभरात उत्सुकता आहे.

विजेत्यांना एका महाकाव्य मोहिमेसाठी एकत्र येण्याची संधी मिळेल जी डिफेंडर ट्रॉफी लोकांवर आणि त्याच्या भेटी असलेल्या ठिकाणी सकारात्मक आणि चिरस्थायी वारसा सोडेल याची खात्री करेल.

एका महाकाव्य मोहिमेला महाकाव्य वाहनाची आवश्यकता असते. नवीन डिफेंडर ११० ट्रॉफी एडिशन हा साहसी खेळ उत्साही लोकांच्या नवीन पिढीसाठी सादर करेल, कारण ही स्पर्धा जागतिक ऑनलाइन प्रेक्षकांद्वारे पाहिली जाईल. या कार्यक्रमाचा उत्साह रस्त्यावर आणत, ट्रॉफी एडिशन दोन खास वारसा-प्रेरित रंगांमध्ये डीप सँडग्लो यलो आणि केसविक ग्रीन विशेषतः निवडलेल्या साहस-तयार स्पेसिफिकेशनसह ऑर्डर करण्यासाठी उपलब्ध आहे.

■ ■ ■



: वाद संवाद :

## काळानुसार एसटी सेवेत परिवर्तन होणे आवश्यक आहे का?

**आनंद मराठे, जेष्ठ नागरिक**

होय बदलत्या काळानुसार महाराष्ट्रातील अगदी खेड्यापाड्यात दुर्गम भागात पोचणाऱ्या एसटी सेवेत बदल हा व्हायलाच हवा. एसटीचे सर्वांगाने अत्याधुनिकरण झाले तरच आर्थिक दृष्टिकोनातून डबघाईला आलेली एसटीची सेवा हि पुढे कायम सुरळीत ठेवता येण शक्य आहे. खाजगी प्रवासी वाहतूक सेवांच्या तुलनेत एसटी चे जुने स्वरूप म्हणजे भंगार आहे यात बदल केल्याशिवाय तरणोपाय नाही.

**जगदीश माळी, एसटी चालक**

एसटीची सेवा हि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची सर्वात स्वस्त आणि दूरगामी सेवा आहे. मध्यंतरी दिवंगत अभिनेते विक्रम गोखले याना एसटी चे ब्रँड अँबेसेडर बनवून नवे बदल केले गेले. मात्र तरी देखील प्रवाशांची एसटीकडे पाठच आहे. एसटीचे खाजगीकरण केले गेले आणि अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी वाहन जर आणली तर एसटीची सेवा हि वेगाने धावू शकेल असं वाटत. ■

**संकलन - संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# कोट्यवधी रुपयांची वाहने धुळखात







■ **कमल नामपल्लीवार, नागपूर, दि. २४ :**

सर्व्हेक्षण, खोदकाम आणि विकास कामांसाठी कोट्यवधी रूपये खर्चून साबांवि, जलसंधारण, भूगर्भ आणि इतर विभागांना महागडी वाहने पुरविली जात असली तरी, अशी अनेक वाहने धुळखात पडली आहेत.

नागपूरच्या जुन्या सचिवालय परिसरात अर्थात विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रशस्त परिसरात असेच एक वाहन गेल्या दोन अडीच वर्षापासून पडलेले दिसून येते. आयशर कंपनीचे हे वाहन महाराष्ट्र शासनाच्या मेट्रोलॉजी विभागाचे आहे.



माहितीनुसार, या वाहनाची किंमत 6 ते 7 कोटी रूपये असून, हे वाहन सुमारे अडीच वर्षांपासून तिथे उभे आहे. याचाच अर्थ या वाहनाचा उपयोग होत नाही. पाणी आणि सूर्यप्रकाशापासून वाहनाचे संरक्षण करण्यासाठी, एका चहा विक्रेत्याने वाहनालाच गोणपाट बांधले आहे. त्याखाली लोक चहाचा आस्वाद घेताना दिसतात.

एकीकडे शे-पाचशे रुपयांचे वीजेचे किंवा पाण्याचे बिल भरले नाही तर पुरवठा खंडीत केला जातो. दुसरीकडे, अशी कोट्यवधी रूपयांची वाहने धूळखात पाडून ठेवली जात आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचीही अशीच अनेक वाहने संबंधित विभागाच्या परिसरात भंगार होवून पडली आहेत.

## अॅड . प्रकाश आंबडेकरांच्या याचिकेवर आज निकाल

नियमबाह्य मतदानाचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :



राज्यातील विधानसभा निवडणुकीत झालेल्या नियमबाह्य मतदानाच्या आरोपांच्या याचिकेवर सुनावणी झाली. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदानाची वेळ संपल्यानंतर 76 लाख लोकांना मतदान केल्याचा आरोप केला होता.


याबाबत त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर आता 25 जूनला निकाल जाहीर होणार आहे.

आज मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी 5 वाजल्यानंतर झालेल्या 76 लाख मतांच्या प्रकरणाची सुनावणी केली. उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले आणि निकाल आज जाहीर करणार आहे.

# डॉ. मुरहरी केळे यांना मराठीत दुसरी पीएच.डी.

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

ज्ञानसाधनेची कोणतीही सीमा नसते, हे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे संत साहित्याचे अभ्यासक, ऊर्जा क्षेत्रातील निष्णात आणि शिक्षणप्रेमी डॉ. मुरहरी केळे यांनी.



त्रिपुरा राज्य विद्युत मंडळाचे माजी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक आणि महाराष्ट्र व मध्यप्रदेशात वीज क्षेत्रात संचालक म्हणून कार्यरत राहिलेल्या डॉ. केळे यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने, छत्रपती संभाजीनगर येथे मराठी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. विशेष म्हणजे, 'निवडक मराठी साहित्यातील विजेचे चित्रणः एक अभ्यास' या त्यांच्या आगळ्यावेगळ्या शोधप्रबंधाने मराठी साहित्यविश्वात एक नवे दालन उघडे केले आहे.

महावितरणच्या नागपूर शहर मंडलात 2008 ते 2011 या काळात अधीक्षक अभियंता म्हणून राहिलेल्या डॉ. केळे यांनी आपल्या संशोधनात गेल्या एक हजार वर्षांतील निवडक काव्यात्मक, कथनात्मक आणि नाट्यात्मक साहित्याचा सखोल अभ्यास केला आहे.

'वीज' या संकल्पनेचा त्यांनी केवळ भौतिक अर्थाने नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, भावनिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून वेध घेतला आहे. वैदिक साहित्यापासून संत-पंत-तंत साहित्यापर्यंत, प्राचीन, अवार्चीन, आधुनिक आणि अत्याधुनिक साहित्यात विजेचे चित्रण कसे बदलत गेले, याचा मागोवा घेत त्यांनी अभ्यासपूर्ण निष्कर्ष काढले आहेत. त्यांच्या या हटके आणि मौलिक संशोधन कार्याचे मराठी साहित्य विश्वातून प्रचंड कौतुक होत आहे. या शोधनिबंधाने मराठी अभ्यासकांचे लक्ष एका पूर्णपणे नवीन आणि अनपेक्षित विषयाकडे वेधले आहे.

डॉ. मुरहरी केळे हे शिक्षणाचे आणि ज्ञानाचे भुकेले व्यक्तिमत्व आहे. विविध विद्यापीठांतून त्यांनी अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, माहिती आणि तंत्रज्ञान, पत्रकारिता, ऊर्जा अंकेक्षण अशा विविध व्यावसायिक विषयांत तब्बल दहा पदव्या संपादन केल्या आहेत.

एवढ्यावरच न थांबता, त्यांनी नागपूर विद्यापीठातून 'पॉवर डीस्ट्रीब्यूशन फ्रान्चायसी' या विषयावर आपली पहिली पीएच.डी. पदवी मिळवली. तरीही मराठी भाषेवरील प्रेमापोटी त्यांनी मराठीत एम.ए. केले आणि आता दुसरी पीएच.डी. मिळवून आपल्या ज्ञानसाधनेची वेगळी उंची गाठली आहे.

डॉ. केळे यांच्या या दुहेरी यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. तेलंगणाचे राज्यपाल आणि त्रिपुरा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री जिष्णू देव वर्मा, विद्यापीठाचे कुलगुरू, उपकुलगुरू यांसह विविध साहित्यिक, प्राध्यापक, अभ्यासक, समाजबांधव आणि वीज क्षेत्रातील सहकाऱ्यांकडून त्यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. मराठी साहित्यातील त्यांच्या या अमूल्य आणि अभिनव योगदानाची विशेष दखल घेतली जात आहे.